**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३**

**मा.स्थायी समिती सभेची नोटीस (ऑनलाईन झुम ॲप द्वारे)**

नगरसचिव कार्यालय

दिनांक :- ०५ /१०/२०२०

प्रति,

मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा क्रमांक ०३ शुक्रवार दिनांक ०९ /१०/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता मा.उपसचिव , महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन झुम ॲप द्वारे आयोजित करण्यात आली आहे. या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत.

तरी सदर सभेत आपण ऑनलाईन सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सही /-

प्र.नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**शुक्रवार दिनांक - ०९/१०/२०२० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ३४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेले परंतु कोव्हिड सेंटर म्हणून सॅल्हलिन आर्मीचे ईव्हॅन्जलिन बुथ हॉस्पीटलच्या दुस-या मजल्याचे अत्यावश्यक दुरूस्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/ क नुसार प्राप्त अधिकारानुसार केलेली अवलोकनार्थ ठेवणेस्तव |
| ३५ | अर्जदार श्री. मुरलीधर व हनुमान मिश्रीलाल बिहाणी , रा. प्लॅाट नं.७,३५/३६ महात्मा फुले चौक, बुरूडगाव ,अ.नगर प्रभाग समिती क्र.०४ वॅार्ड क्र. २० बिल नं.z४२०१०४३५२ हे बील डबल झाल्यामुळे ओपन प्लॅाट व बंगल्याप्रमाणे बिलाची आकारणी झालेली असुन बंगल्याचे बिल देउन ओपन प्लाटॅचे बील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३६ | अर्जदार श्री. बाबुराव संतुजी साळुंके , रा.साळुंके मळा बुरूडगाव रोड , सर्व्हे नं.६१,६२,६३/१.६३/२.६४/६५ येथे प्रभाग समिती क्र.४ , वॅार्ड क्र.३० बिल क्र.१६५ व १५७ सदर जागा ही बिगर शेती शेतजमिनीस केलेली पडक्या खोल्यांची आकारणी मालमत्ताकर व पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ३७ | अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १.सौ.रेखा रमेश अमोलिक २.सौ.शितल गंगाराम शिंदे ३.सौ.तृप्ती रावसाहेब बडे यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्तीप्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनामध्ये वाढ करून केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

PTO

| | |
|---|---|
| ३८ | अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी राहुल शंकर पडोळे यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ३९ | अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेकिल) व (सिव्हील) यापदी १] स्नेहल राजेंद्र मुळे,२] राहुल सदाशिव गिते, ३] प्रदिप सदाशिव ढगे यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ४० | इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ४१ | अहमदनगर महानगरपलिका बुरूडगांव स.नं. ३४ येथे ५ KLD क्षमतेचा ETP दुरूस्त करणे बाबत महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) क अन्वये च्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४२ | अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाअंतर्गत पथदिवे देखभाल दुरूस्तीकरीता मा.नगरसेवक स्वेच्छा निधीमधून विदयुत साहित्य खरेदी करणेबाबतचा ऑफीस रिपोर्ट. |
| ४३ | पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी १] संदिप प्रभाकर पुंड, २] मनिष कैलास सोनवणे , व पंपचालक यापदी ३] सागर दिलीप जाधव ,४] गहिनीनाथ अंबादास मेने यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनामध्ये वाढ करून करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |

**टिप-** १] प्रत्येक सदस्यांने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरून Zoom App डाउनलोड करून घ्यावे.

२] Zoom App द्वारे प्रत्येक सदस्यांना मा.स्थायी समिती सभेस उपस्थित राहता येईल.

३] मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकासविभाग यांचेकडील दि.०३जुलै२०२०रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम ॲप द्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत- १]** विषय क्रमांक- ३४ ते ४३ टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**
**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम ॲप द्वारे)**

विषय क्रमांक- ३४ शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेले परंतु कोव्हिड सेंटर म्हणून सॅव्हलिन आर्मीचे ईव्हॅन्जलिन बुथ हॉस्पीटलच्या दुस-या मजल्याचे अत्यावश्यक दुरूस्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/ क नुसार प्राप्त अधिकारानुसार केलेली अवलोकनार्थ ठेवणेस्तव

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,दि.२६/५/२०२० रोजी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे कार्यालयात मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका व मा.आरोग्य अधिकारी यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार व मौखिक आदेशानुसार अहमदनगर जिल्हयाचे कोव्हिड सेंटर म्हणुन सॅव्हलिन आर्मीचे ईव्हॅन्जलिन बुथ हॉस्पीटल घोषीत केलेले आहे व तेथील कोरोना पॉझिटीव्ह रूग्णांची वाढती संख्या पाहता सदर हॉस्पीटलच्या ईमारतीचे पुढील बाजूचे द्वितीय मजल्यावर खालीलप्रमाणे दुरूस्ती करणे अत्यावश्यक आहे.

१] दरवाजाला कॉलॅब सिबल गेट लावणे.
२] हॉलमध्ये आवश्यक फॅन व टयुब लाईट व तदः अनुषंगिक व्यवस्था करणे.
३] हॉलच्या लगतचे शौचालय, बाथरूम,दरवाजा ईत्यादी दुरूस्तीची कामे करणे.
४] लिकेज स्लॅबची दुरूस्ती करणे
५] रूग्ण वाहिका बाहेरील गेटमधून आतील गेटमध्ये ये-जा करण्यासाठी रस्ता लेव्हल करून मुरूम टाकणे.
६] कोरोना पॉझिटीव्ह रूग्णाच्या व्यवस्थेसाठी व तदःसंबंधित कामे श्री मेजर कळकुंभे (मो.९५९४१८७६९१) यांच्या मार्गदर्शनाखालि करणे.

वरील ईमारतीच्या परिस्थितीची पाहणी मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका मा.आरोग्य अधिकारी यांनी श्री.मेजर कळकुंभे यांच्या समवेत केलेली असुन सदर कामे तातडीने करणे आवश्यक असल्याचे व सदरील काम कोव्हिड प्रतिबंधात्मक उपाय योजने मधील असल्याने वरीलप्रमाणे कामाकरीता होणारा खर्च हा १४ व्या वित्त आयोग निधी योजनेतून प्रस्तावीत करणेबाबत मौखिक आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार उपरोक्त काम अहमदनगर महानगरपलिकेमार्फत १४ वा वित्त आयोग निधी अंतर्गत सविस्तर मोजमाप घेउन पुढील कार्यवाही करणेच्या मान्यस्तव रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, सादर कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत वरीलप्रमाणे अत्यावश्यक तातडीने करणे आवश्यक आहे. आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की, कोव्हिड केअर सेंटर उभारणेकरिता ईव्हॅन्जलिन बुथ हॉस्पीटल अधिग्रहीत करण्यात आलेले आहे. मनपाचे कोव्हिड केअर सेंटर सुरू करणेकामी सदरचे हॉस्पीटल बरोबर MOV करून घेता येईल. तथापी तातडीने सदरचे कामकाज मनपातर्फे करून घेउन कोव्हिड केअर सेंटरची सुविधा सुरू करणेस व त्याकरिता आवश्यक खर्च मा.शासनाचे मार्गदर्शनानुसार करणे उचित राहिल असे मत आहे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या अभिप्रायानुसार MOV प्रस्तावीत केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, उक्त काम केलेनंतर पूर्ण अहवाल खर्च सहित पाठवावा. याबाबत उक्त खर्च जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत करणेस प्रस्ताव सादर करावे.दि.२९/५/२०२०

००***००

संदर्भ- मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांची दि.२९/५/२०२० रोजीची मान्यता

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, दि.२६/५/२०२० रोजी मा.जिल्हाधिकारी अहमदनगर, मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका व मा.आरोग्य अधिकारी प्रत्यक्ष पाहणीनुसार अहमदनगर जिल्हयाचे कोव्हिड सेंटर म्हणून सॅव्हलिन आर्मीचे ईव्हॅन्जलिन बुथ हॉस्पीटल घोषीत केलेले आहे व तेथील कोरोना पॉझिटीव्ह रूग्णांची वाढती संख्या पाहता सदर हॉस्पीटलच्या अस्तित्वात असलेली ईमारत पुर्ण क्षमतेने भरलेली आहे. त्यामुळे त्याच ईमारतीतील पुढील बाजुच द्वितीय मजला विना वापर ब-याच वर्षापसून पडलेला असलेने उक्त संदर्भान्वये सदर ईमारत दुरूस्त करणेचे आदेश दिल्यानुसार मा.आयुक्त यांनी दि.२९/५/२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष खालिल प्रमाणे कामे केलेली आहे.

१] शौचालय व बाथरूम आवश्यक दरवाजे बसविणे व आवश्यक प्लंबिंग कामे करणे

२] शौचालय भांडे ४ नग बसविणे व रूम बेसिन बसविणे

३] पश्चिमेकडे पोहोच रस्ता करणे.

४] २००० लिटरची पाण्याची टाकी बसविणे.

५] कॉलॅबसिबल समवेत दरवाजे बसविणे

६] खिडक्यांना काचा लावणे

७] फॅन व उजेड व्यवस्थेकरीता टयुब लाईट लावणे व आवश्यक पॉईट बसविणे

८] कंपार्टमेंट बनविणेकरीता ॲल्युमीनियम पार्टीशन करणे.

प्रत्यक्ष टप्प्यामध्ये वरील कामे त्वरीत हाती घेण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार सदरचे काम सन २०२०-२०२१ वर्षाचे इमारत दुरूस्तीची निविदा मंजुरी स्तरावर आहे. सदरची निविदाचा तांत्रिक लिफाफा अमान्य करून व्यापारी लिफाफा उघडण्यात आला आहे. त्यामध्ये श्री. अनिल झेड कोठारी यांचे दर निविदेपेक्षा ०.९९९९९९% कमी दराने कमी दराने निविदा मंजुरी कार्यवाही प्रगतीत आहे.

तथापी कोरोनाचे पॉझिटीव्ह पेशंटची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने मा.जिल्हाधिकारी , मा.आयुक्त , मा. आरोग्यधिकारी यांनी समक्ष पहाणी नुसार काम तातडीने हाती घेण्याचे आदेश दिलेले आहेत त्यानुसार मा.आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसार काम तातडीने सुरू केले आहे.

सदरचे काम तातडीचे असल्याने मा.स्थायी समितीची मंजुरी गृहित धरून सदरचे काम वार्षिक मंजुर निविदाधारक श्री. अनिल झेड कोठारी, अहमदनगर यांचेकडून सा.बां.विभाग दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९९९९९९ % कमी दराने करून घेण्यात आलेले आहे. सदर कामाचा रक्कम रूपये ६,९८,२०१/- GST सह खर्च झालेला आहे.

सदरची निविदा मंजुरी स्तरावर आहे त्यास मा.स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागेल. मा.स्थायी समितीने दर कमी जास्त केल्यास ते ठेकेदारावर बंधनकारक राहिल असे लेखी घेणे आवश्यक आहे. जर बिल कमी जास्त झाले तर मा.स्थायी समितीने दर कमी जास्त केले जादा दिलेली रक्कम ठेकेदाराच्या पुढील बिलातून वसुल करण्यात येईल असे ठेकेदाराकडून लेखी घेणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त सो. यांचे दि.२९/५/२०२० च्या मान्यतेनुसार उक्त काम केलेनंतर पुर्ण अहवाल खर्चासहीत पाठवावा व सदरचा होणारा खर्च 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन' अंतर्गत करणेस मान्यता दिलेली अहे. परंतु "जिल्हा आपत्ती व्यवस्थापन" या नावाने सन २०२०-२०२१च्या बजेट मध्ये या नावे लेखाशिर्षक नाही.

मा.जिल्हाधिकारी यांचेकडून कोव्हिड-१९ करीता महानगरपालिकेस वेळोवेळी रक्कम रूपये १६,००,०००/- लक्ष निधी प्राप्त झालेला आहे व सदरचा निधी आरोग्य विभागामार्फत शासकीय अनुदाने या हेडवर जमा केलेला आहे. त्यामधून सदरचे देयक अदा करावे लागेल. शासकीय अनुदाने या नावे संगणक प्रणालीमध्ये लेखाशिर्षक नसल्याने सध्या सदरचे काम महानगरपालिका फंडातील लेखाशिर्षका अंतर्गत नोंदवुन मंजुरी घेणे आवश्यक आहे./ क्ष

त्यानुसार मा.आयुक्त , मा. जिल्हाधिकारी यांचे वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार सदरचे काम तातडीचे असल्याने सन २०२०-२०२१ वर्षाचे "इमारत दुरूस्ती" चे निविदा धारक अनिल झेड कोठारी, अहमदनगर यांचेकडून करून घेण्यात आलेले आहे.

सदरचे काम आरोग्याच्या दृष्टीने तातडीने असल्याने मा.आयुक्त यांना महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/क नुसार प्राप्त अधिकारानुसार सदरचे काम अनिल झेड कोठारी अहमदनगर करून घेण्यात आलेले आहे. झालेल्या कामाचे मोजमाप घेवुन व म.जि.प्रा.चे सन २०१९-२०२० चे दरसुचीचे दर वापरून काम करून घेणेत आलेले आहे व त्याकरीता रक्कम रूपये ६,९८,२०१/- इतका खर्च झालेला आहे. सदरचा प्रस्ताव काम कार्यवाही झालेनंतर अवलोकनार्थी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस सादर व सदरचा खर्च मा.शासनाकडून प्राप्त कोव्हिड-१९ करीता प्राप्त अनुदानातून अदा करण्यास मान्यतेस्तव सादर. तरी सदर कामास व रक्कम रूपये ६,९८,२०१/- चे झालेल्या खर्चास मंजुरीस्तव सविनय सादर./अ

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, सादर, सदरील कामे कोरोना फैलाव रोखण्यासाठी केलेला उपाययोजनेचा भाग असल्याने वरील "अ" प्रमाणे कार्यवाही करणे योग्य

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, सा.बां.विभागाचे शासन निर्णय दि.२७/९/२०१८ विना निविदा काम देण्याबाबत तरतुदीची खात्री करून प्रस्तावीत केलेल्या कामाबाबत विभागाने खात्री करून मनपा अधिनियम १९४९ मधील कलम ८६,८७,९० (१) (२) (३) मधील तरतुदीप्रमणे कार्यवाही करून झालेल्या खर्च आपत्ती व व्यवस्थापन या अंतर्गत मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या कोव्हीड-१९ या अनुदानातून मा.स्थायी समिती मान्यता घेउन मंजुरी देता येईल.

यावर कनिष्ठ अभियंता यांचा अभिप्राय की , फेरसादर मा.मुलेप यांना प्रस्तावीत रिपोर्टची तातडी लक्षात न घेता मनपा अधिनियम कलम ८६,८७,९० हया तरतुदीप्रमाणे कार्यवाही बाबत अभिप्राय नोंदविण आहे. प्रत्यक्षात कलम ८६,८७,९० या अर्थसंकल्पीत तरतुदी व्यतिरिक्त करावयाचे कामाची पध्दत दर्शविली असे मत आहे. त्यामुळे सदर प्रस्तावास लागू होत नाही असे मत प्रस्तावीत रिपोर्ट मध्ये "क्ष" मध्ये नमूद प्रमाणे मा.आयुक्त यांचे मंजुरी घेवूनच कार्यवाही करण्यात येईल. विना निविदा बाबत प्रस्तावीत रिपोर्ट मधील "अ" नमुद प्रमाणे कार्यवाही प्रस्तावीत त्याकरीता मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यात येणार आहे. मान्यतेस्तव

यावर शहर अभियंता यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मा.उपायुक्त दि.१३/७/२०२० पासून कोरोना म्हणून होम कॉरंन्टाईन, रजेवर

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचा

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- इथापे साहेब माहिती सांगा

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- अहमदनगर शहरामध्ये कोरोनाचा वाढता प्रदुर्भाव सुरू झाला त्यावेळी जिल्हा प्रशासन व अहमदनगर महानगरपालिकेने शहरातील बुथ हॉस्पीटल या ठिकाणी कोवीड सेंटर सुरू करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी मा.आयुक्त ,मा.जिल्हाधीकारी व मी स्वत:पहाणी केली.त्या हॉस्पीटल मध्ये बेडची संख्या मर्यादित होती.आणखी पेशंट वाढल्यामुळे ,आणखी बेडची आवश्यकता वाढल्यामुळे त्या जुन्या इमारतीला दुरूस्तीची गरज होती.आणि त्यावेळी मा.आयुक्त व मा.जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सुचने नुसार या ठिकाणी देखभाल दुरूस्तीचे काम हाती घेतले.त्या ठिकाणी लाईट नव्हते,पंखे नव्हते,दरवाजा व खिडक्या तुटलेल्या होत्या संडास बाथरूम तुटलेले होते,काही ठिकाणी पार्टीशन करण्याचे काम आपण एस्टीमेंट रेट नुसार हाती घेतले आपले वार्षीक टेंडर ज्यांचे मंजूर आहे.इमारत दुरूस्ती देखभाल करण करीता त्यांचे कडून हे काम करून घेतले आहे.लेखाविभागाने त्यावर आक्षेप घेतला होता की हा खर्च केल्या नंतर मा.स्थायी समितीची मंजूर घ्यावी.आणी म्हणून सर्वसाधारण नउ लाखाच्या दरम्यान या कामासाठी खर्च झालेला आहे.खर्च करून काम पुर्ण झाले आहे.फक्त हे माहितीस्तव आणि कार्योत्तार मंजूरी घेण्यासाठी मा.स्थायी समिती समोर हा विषय सादर केला आहे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेले परंतु कोव्हिड सेंटर म्हणून सॅव्हलिन आर्मीचे ईव्हॅन्जलिन बुथ हॉस्पीटलच्या दुस-या मजल्याचे अत्यावश्यक दुरूस्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/ क नुसार प्राप्त अधिकारानुसार केलेली कार्यवाही मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेले परंतु कोव्हिड सेंटर म्हणून सॅव्हलिन आर्मीचे ईव्हॅन्जलिन बुथ हॉस्पीटलच्या दुस-या मजल्याचे अत्यावश्यक दुरूस्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/ क नुसार प्राप्त अधिकारानुसार केलेली कार्यवाही मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**
**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम अॅप द्वारे)**

विषय क्रमांक- ३५ शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- अर्जदार श्री. मुरलीधर व हनुमान मिश्रीलाल बिहाणी , रा. प्लॉट नं.७,३५/३६ महात्मा फुले चौक, बुरूडगाव ,अ.नगर प्रभाग समिती क्र.०४ वॉर्ड क्र. २० बिल नं.Z४२०१०४३५२ हे बील डबल झाल्यामुळे ओपन प्लॉट व बंगल्याप्रमाणे बिलाची आकारणी झालेली असुन बंगल्याचे बिल देउन ओपन प्लाटॅचे बील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरूडगाव

संदर्भ- श्री. मुरलीधर व हनुमान मिश्रीलाल बिहाणी यांचे दि.१६/११/२०१९ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयान्वये प्रभाग समिती क्र.४ विभागाकडे मालमत्ता धारक श्री.मुरलीधर व हनुमान मिश्रीलाल बिहाणी यांनी ओपन प्लॉटचे बील रद्द करणेबाबत दि.१६/११/२०१९ च्या विनंती अर्ज देउन कळविले आहे की, ओपन प्लॉट व बंगल्याप्रमाणे बिलाची आकारणी झालेली असुन बंगल्याचे बिल देउन ओपन प्लॉटचे बिल रद्द करावे विनंती केलेली आहे.

सदरील मिळकत ही महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्र मध्ये बुरूडगाव प्रभाग समिती कार्यालय क्र.४ मध्ये येत असुन मालमत्ता धारक मुरलीधार व हनुमान मिश्रीलाल बिहाणी यांना मोकळया जागेबाबत बील क्र.२०/१०२३ (बिल नं.-Z४२०१०४३५२) येत असुन सदरचे ओपन प्लॉट बंगल्याचे (बिल नं.-Z४२०१०४३२२६)वर बिल येत असुन तरी २०/१०१३ वर हे डबल बील येत असुन त्याच मिळकतीच्या ओपन प्लॉटवर बांधकाम होउन वापर होत असल्याने त्याची आकारणी करण्यात येत आहे. त्या आकारणी मिळकतीचे बील क्र.२०/२५ (बिल नं.-Z४२०१०४३५२)मालमत्ता धारक श्री. मुरलीधर व हनुमान मिश्रीलाल बिहाणी या नावाने दुसरे बिल येत असुन सदरील मिळकती वरील बील २०/१०१३ (बिल नं.-Z४२०१०४३५२) हे बील रद्द करणेबाबत अर्जदार यांच्या दि.१६/११/२०१९ च्या विनंतीच्या अर्जानुसार व समक्ष पाहणी प्रमाणे संगणकावर दुरूस्ती बील करणेस व एक मोकळया जागेचे बील रदद करणेस आदेश सादर

सदरील वॉर्ड नं.२० बील नं.१०१३ हे बील डबल झाल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती च्या मान्यतेने रक्कम रू.३६,९९२/- निर्लेखित करणे आवश्यक आहे तथापी आदेशा सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक,कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग समिती क्र.४यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक व कर निरीक्षक यांनी प्रस्तावीत केलेनुसार ओपन प्लॉटचे बिल नं.१०१३रद्द करणेस व रू.३६९९२/-मा.स्थायी समिती पुढे कमी करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर रिव्हीजन विभाग यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार तत्कालीन कर्मचारी यांनी मालमत्ता धारकाची ओपन प्लॉटची नोंद असतांना त्याची खात्री न करता नवीन जु.मा.क्र.२५वर इमारतीची कर आकारणी करण्यात आली आहे. सदर मालमत्ता धारकाची जु.मा.क्र.१०१२ व १०१३ अशा दोन खुल्या भुखंडाची नोंद होती. या दोन्ही पैकी एकावर बांधकामाची कर आकारणी टाकणे आवश्यक होते. जु.मा.क्र.१०१२ वर ओपन प्लॉटवर कराच्या भरणा मालमत्ता धारक करत आहेत.व १०१३ हा डबल प्लॉटची नोंद तशी अदयापपर्यत सुरू आहे त्या भुखंडाची डबल नोंद असल्याने त्यावरील कराची रक्कम संबंधीत मालमत्ता धारक भरत नाही. त्यामुळे ती रक्कम वसुल न होणारी असुन ती मिळकत कर आकारणी तुन रद्द करणे आवश्यक आहे. तरी सदर मिळकतीची रक्कम वसुल न होणारी असल्याने मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करणे विषयी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर/अ

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, open plot वरील बांधकाम झालेल्या इमारतीवर आकारणी होत आहे तथापी त्याच जागेवर रिकाम्या प्लॉटची ही आकारणी होत आहे त्यामुळे सदरच्या जागेवरील बिल नं.१०१३ रदद करून त्यावरील वसूल न होणारी रक्कम रू.३६९९२/- निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मंजूरी मिळणेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, अभिप्रायानुसार मान्य.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ३५ चे वाचन करा

त्यानुसार सभेमध्ये विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ३५ व ३६ निर्लेखित करण्याचे असल्योन मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री. मुरलीधर व हनुमान मिश्रीलाल बिहाणी , रा. प्लॉट नं.७,३५/३६ महात्मा फुले चौक, बुरूडगाव ,अ.नगर प्रभाग समिती क्र.०४ वॉर्ड क्र. २० बिल नं.Z४२०१०४३५२ हे बील डबल झाल्यामुळे ओपन प्लॉट व बंगल्याप्रमाणे बिलाची आकारणी झालेली असुन बंगल्याचे बिल देउन ओपन प्लाटॅचे बील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम अॅप द्वारे)**

विषय क्रमांक- ३६ शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- अर्जदार श्री. बाबुराव संतुजी साळुंके , रा.साळुंके मळा बुरूडगाव रोड , सर्व्हे नं.६१,६२,६३/१.६३/२.६४/६५ येथे प्रभाग समिती क्र.४ , वॉर्ड क्र.३० बिल क्र.१६५ व १५७ सदर जागा ही बिगर शेती शेतजमिनीस केलेली पडक्या खोल्यांची आकारणी मालमत्ताकर व पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांव

संदर्भ- दि.४/११/२०११, १६/६/२०१६ रोजीचे अर्ज २४/२/२०२०

प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र.३० वसुली लिपिक यांजकडून विनंती प्रस्ताव देण्यात येतो की, वॉर्ड क्र.३० बिल क्र.१५६ व १५७ भोग- बाबुराव संतुजी सांळुके या नावे सन २००३ ते २०२० अखेर या आर्थिक फेर मुल्यांकन सर्व्हे मध्ये तत्कालीन रिव्हीजन ऑफिसर यांनी परिशिष्ट कर आकारणी कामी नोंद घेण्यात आलेली आहे. वास्तविक पहाता सन १९९९ या सन मध्ये नगरपालिका हद्दवाढ होवुन बुरूडगांव ग्रामपंचायतीचा भाग हद्दवाढी मध्ये महानगरपालिका क्षेत्रात समावेश केल्याने रिव्हीजन ऑफिसर यांनी कागदपत्रांची पडताळणी न करता सदर मिळकत ही शेतजमिन व शेतजमिनीचे क्षेत्रात वास्तव्याची घरास नोंद घेवुन कर आकारणी केल्याचे निदर्शनास येते. तसेच सदरचा भाग अर्जदार बाबुराव संतुजी सांळुके यांनी यापुर्वीचा दि.४/११/२०११,१६/६/२०१६ व २४/२/२०२० अन्वये महानगरपालिकेकडे अर्ज दाखल करून कळविले आहे की माझे पुर्वी शेतजमिनीत बांधलेले जुने घर होते आजही जागा एन.ए. नसुन शेतजमिन आहे. तरी घरपटटी व पाणीपटटी रदद करण्यात यावी. अर्जदार यांनी अर्जासोबत टी.पी. क्र.३७५० दि.१०/७/२०१७ रेखांकन नकाशा अंतिम मंजुरी छायांकित प्रत सोबत जोडून दिलेली असुन अर्जदार यांचे शेतजमिनीस केलेली आकारणी थकबाकी सन २००३ ते २०२० अखेर (बील नं.१५६) Z४३०१११९१२ विठठल संतुजी साळुंकेची ८६४२५ व (बील नं.१५७)Z४३०१११९१३ श्री बाबुराव संतुजी साळुंके ची ९९१११ इतकी असुन महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कराधान प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२ नुसार वसुल न होण्या जोगा कर निर्लेखित करणेबाबत आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक प्रभाग समिती .४ यांचा अभिप्राय की,वसुली लिपिक यांनी सादर प्रस्तावानुसार सदर मिळकत शेतजमीन आहे.सदर मिळकती वरील मालमत्ता कर वसुल न होणारा आहे.सबब महाराष्ट्र प्रांतिक अधि १९४९ मधील कराधान प्रकरण ८ नियम १५२ अन्वये निर्लेखित करणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक व कर निरीक्षक यांनी प्रस्तावीत केलेनुसार पुढील आदेशार्थ सादर.

यावर सहा. मु.नि.तथा कर सं. अधिकारी यांचा अभिप्राय की, जुना मालमत्ता क्र.१५७ बाबत सन २०११ मध्ये अर्ज केलेला आहे जुना मा.क्र. १५६ हा कोठुन आणला आहे. त्याचे लेखे सादर करावीत.

यावर कर निरीक्षक पयांचा अभिप्राय की, फेरसादर वॉर्ड नं.३० बिल क्र.१५६,१५७ मो. बाबूराव संतुजी सांळुके व विठठल संतुजी सांळुके या नावे सन २००३ ते २०२० अखेर या आर्थिक फेर मुल्यांकन सर्व्हे मध्ये तत्कालीन रिव्हीजन आफिसर यांनी परिशिष्ट कर आकारणी कामी नोंद घेण्यात आलेली आहे तरी १५६ व १५७ हे परिशिष्ट जोडले आहे.

यावर रिव्हीज विभाग यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार चाहुराणा बु. ६१,६२,६३/१,६३/२,६४,६५ २७ सर्व्हे नंबरच्या जमिनीत जुना क्र.१५६व १५७ २७ दोन पत्र्याचे बांधकाम

असलेल्या खोल्या होत्या त्या सन २००३ मध्ये पाडल्या होत्या असे अर्जदार यांचे म्हणणे आहे त्यावेळेस तत्कालीन कर्मचारी यांनी आकारणी रदद करण्याचा प्रस्ताव सादर केलेल्या नाही त्यामुळे आजतागायत आकारणी सुरू आहे त्या विना कारण कराची डिमांड वाढत चाललेली आहे. आणि ती रक्कम वसुल न होणारी असल्याने मा.स्थायी समितीच्या मान्यतेने उक्त कलमान्वये सदरच्या प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की "अ" प्रमाणे तसेच कर संकलन यांचे अभिप्रायानुसार मान्य कराची रक्कम निर्लेखित होणेस्तव स्थायी समितीची मान्यता घेण्यात यावी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रकरण येवढया विलंबाचे कारण स्पष्ट करावे व उक्त अर्जदार आपले येणे किती कर भरणा करणार का ? खुलासा करावा.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, फेरसादर मिळकत ही शेतजमीन व शेती जमिनीचे क्षेत्रात वास्त त्याची घरास नोंद घेउन कर आकारणी केल्याचे निदर्शनास येते कर आकारणी कमी करणे या पुर्वा दिनांक १६/६/२०१६ रोजी अर्ज दाखल करण्यात आलेला होता परंतु तत्कालीन कर्मचारी यांना दाखल अर्जावर कार्यालयीन कार्यवाही केल्याबाबत आढळुन येत नाही. अर्जदार यांचे शेतजमीन व शेतजमिनीचे पुर्वाचे कर आकारणी क्षेत्र संपुर्ण जाडलेले असुन सदरचे क्षेत्र हे ९ मी रूंदी रोड झालेला असुन सदरची कर आकारणी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२ नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही करा बदल किंवा कोणताही कर वसुल करण्यासाठी झालेल्या स्वर्चाबदल येणे असलेली जी कोणती ही रक्कम त्याच्या मते वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल तथापी सविनय सादर.

यावर मा. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, चर्चा उक्तप्रमाणे

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ३५ चे वाचन करा

त्यानुसार सभेमध्ये विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ३५ व ३६ निर्लेखित करण्याचे असल्योन मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री. बाबुराव संतुजी साळुंके , रा.साळुंके मळा बुरूडगाव रोड , सर्व्हे नं.६१,६२,६३/१.६३/२.६४/६५ येथे प्रभाग समिती क्र.४ , वॉर्ड क्र.३० बिल क्र.१६५ व १५७ सदर जागा ही बिगर शेती शेतजमिनीस केलेली पडक्या खोल्यांची आकारणी मालमत्तताकर व पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**
**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम ॲप द्वारे)**

विषय क्रमांक- ३७ शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १.सौ.रेखा रमेश अमोलिक २.सौ.शितल गंगाराम शिंदे ३.सौ.तृप्ती रावसाहेब बडे यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्तीप्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनामध्ये वाढ करून केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.वा.७८ दि.१४/५/२०१९ अन्वयेचा मानधनावाढ बाबत प्रस्ताव

२. कै. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.वा. ५३९ दि.२५/११/२०१९ चा प्रस्ताव

३. मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३९ दि.१७/१/२०२० अन्वयेचा पारीत ठराव

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. ५९६ दि.१०/१२/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १] रेखा रमेश अमोलिक २] शितल गंगाराम शिंदे ३] तृप्ती रावसाहेब बडे यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.१२/०१/२०१९ ते ११/०७/२०१९ अखेर असुन सदरची मुदत ही दि. १२/७/२०१९रोजी पासून समाप्त होत असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि.१५/७/२०१९ पासून पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.७२ दि.१९/८/२०१९ च्या पारित ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ३००० दि.२९/११/२०१९ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसार तात्पुरत्य स्वरूपात परिचारिका यापदी १] रेखा रमेश अमोलिक २] शितल गंगाराम शिंदे ३] तृप्ती रावसाहेब बडे यांची रू.१०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.१२/१/२०१९ पासून सहा महिन्याकरिता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि.१२/७/२०१९ रोजी पासून समाप्त झालेली आहे.

कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.वा.७८ दि.१४/५/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करून कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मानधनावरील नियुक्ती करीता यांचे मानधनामध्ये १०% वाढ करणेबाबत सुचित केलेले होते. त्यानुषंगाने दिनांक २८/०५/२०१९ रोजी प्रस्तुत प्रकरणी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.उपायुक्त (सा.) यांनी मानधन वाढ बाबत पुर्ननियुक्तीच्या वेळेस प्रस्ताव ठेवण्यात यावा असे शेरांकना नुसार नमुद केलेले आहे.

यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र.१३९दि.१७/१/२०२०अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी नियुक्तीकरीता दरमहा मानधनामध्ये ३०%प्रमाणे वाढ करणेस मान्यता दिलेली असून सद्यस्थितीमध्ये कै.बा.दे.दवाखाना मानधनावरील परिचारीका यांना दरमहा मानधनामध्ये ३०%वाढ करून नियुक्तीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

संदर्भ क्र.१व२च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आस्थापना विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात येवून मा.आयुक्त यांचे दि.०५/०३/२०२० मान्यतेनुसार संबंधीतांची सहामहिन्याकरीता मानधनामध्ये वाढ करून मानधनावर नियुक्तीस पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थायीसमितीकडे पाठविण्यात आलेला होता.

सद्यस्थितीमध्ये कोरोना (कोव्हीड-१९) या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होत असल्याने भारतामध्ये सगळीकडे लॉकडाउन करण्यात आलेले आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समितीची बैठक होणेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

तरी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेचा विचार करता विशिष्ट बाब म्हणून वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने कै.बा.दे. दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १] रेखा रमेश अमोलिक २] शितल गंगाराम शिंदे ३] तृप्ती रावसाहेब बडे यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील दिनांक १५/७/२०१९ पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे संदर्भ क्र.१ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दरमहा मानधनामध्ये ३०% वाढ करून रूपये १३,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा.स्थायी समितीच्या मंजुरीस अधिन राहुन नियुक्ती करून तदनंतर सदर पुर्ननियुक्तीस अखेर कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव पाठविणे बाबत प्रस्ताव मान्य झाल्यास सोबत सदर मानधनावर पुर्ननियुक्ती बाबतचा आदेश स्वाक्षरीसाठी सादर./अ

येणेप्रमाणे सहा.आयुक्त, आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३(१)(३) नुसार सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही अशाी स्पष्ट तरतुद आहे. विभागाने उक्त तरतुदीचा अवलंब करून विभागाने  कार्यवाही करणेस हरकत नसावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी असल्यामुळे मा.स्थायी समितीच्या मान्यतेस अधिन राहुन "अ" नुसार पुर्ननियुक्ती सहा महिन्यासाठी देण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, उक्त बाबत AMC समक्ष चर्चा करावी व प्रथम नियुक्ती कधीची आहे व मागील आदेश पहाता विसंगती निदर्शनास येते खुलासा करावा.

यावर सहा.आयुक्त आस्थापना यांचा अभिप्राय की, फेरसादर, उपरोक्त प्रस्तावातील मा.आयुक्त यांचे दि.२३/०६/२०२० रोजीच्या शेरांकनानुसार सादर करण्यात येते की, संबंधीतांची प्रथम नियुक्तीबाबत माहिती खालील तक्त्यानुसार दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | प्रथम नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रेखा रमेश अमोलिक | पारिचारीका | दि.०८/०७/२०१३ पासून |
| २ | शितल गंगाराम शिंदे | परिचारीका | दि.२३/१२/२०१४ पासून |
| ३ | तृप्ती रावसाहेब बडे | परिचारीका | दि.२३/१२/२०१४ पासून |

तद्नंतर संबंधीतांची मुदत समाप्तीनंतर कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडून पुर्ननेमणूकी देणेबाबत वेळोवेळी प्रस्ताव सादर करण्यात आले. त्यानुषंगाने प्रस्ताव सादर होवून मा.स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेने वेळोवेळी संबंधीतांना तांत्रिक खंड देवुन सहामहिन्याकरिता मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.प्रस्तुत प्रस्तावामध्ये यापुर्वी संबंधीतांची जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणूक ३००० दि.२९/११/२०१९ अन्वयेच्या आदेशानुसार दि.१२/०२/२०१९ पासून सहा महिन्याकरिता मानधनावर नियुक्ती केलेली असून सदरची मुदत ही यापुर्वीच दि.१२/०७/२०१९ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तथापी कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवा असल्याने सद्यस्थितीमध्ये कै.बा.दे.दवाखाना यांनी तेव्हापासून संबंधीताना कामावर कार्यरत ठेवलेले असल्याने सदरच्या प्रस्तावामध्ये संबंधीतांना तांत्रिक खंड देवुन दि.१५/७/२०१९ पासून सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननेमणूकी देणेबाबत प्रस्तावीत केलेले आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी प्रस्ताव मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ३७ चे वाचन करा

त्यानुसार सभेमध्ये विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.गणेश भोसले : या विषया बरोबर रक्तपेढी विभागातील पल्लवी दगडू मोरे यांच्या प्रस्तावास येण्यास उशिर झाल्याने पुर्ननियुक्ती देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ३७ ते ४० पुर्ननियुक्तीचे असल्याने मंजूर करण्यात येत आहे.पुढे तो विषय घेवू.ज्या परिचारीका आपल्याकडे आधीपासून काम करीता आहेत.त्यांना मानधन कमी होते.ही बाब लक्षात घेवून त्यांच्या दरमहा मानधानामध्ये रक्कम रूपये ३०००/- ने वाढ करण्यात येत आहे. आपल्याकडे पहिल्या ज्या परिचारीका होत्या त्यांना मानधन कमी होते.आता नव्याने कोवीडच्या काळामध्ये परिचारीका भरल्या त्यांना मानधन जास्त आहे.त्यानुसार त्यांचे म्हणणे होते की आमचा देखील विचार केला जावा.त्यामुळे आपण त्यांच्या मानधनामध्ये ३०००/- रूपयांनी वाढ करीत आहोत.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- मा.सभापती साहेब ,आपल्या इलेक्ट्रीक विभागातील कर्मचारी त्यांनी सुध्दा मागणी केली होती मानधन वाढवून मीळावे.बरेच वायरमन शहराच्या बाहेरून येतात.चिचोंडी व इतर परिसरातुन येतात.त्यांच्या मानधनामध्ये वाढ केली तर बरे राहिल.वॉर्ड चार ते पाच किलोमीटरचा आहे.त्यांना ऑफिस मधूनकामाच्या ठिकाणी जायला पेट्रोलचा खर्च होतो.त्यामुळे त्यांच्या मानधनामध्ये वाढ केली तर बरे राहिल.

मा.सभापती साहेब :- डॉ.साहेब ,आपण त्यांच्या मानधनामध्ये मागील सभेमध्ये वाढ केली आहे.मधल्याकाळामध्ये त्यांना काम जास्त झाले आहे.पहिले काही वायरमन होते,त्यातील काही निघून गेले किंवा सुपरवायझर म्हणून काम दिले,त्यामूळे यांचे काम पहिल्यापेक्षा डबल झाले आहे.या गोष्टींचा विचार करून काही वाढ देता येत असेल तर पहा.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- मा.सभापती साहेब,मागील सभेमध्ये आपण मागणी केली होती की महानगरपालिकेच्या वतीने एक अदयावत रूग्णालय करण्यात यावे.कारण सध्या महानगरपालिकेच्या दवाखाण्यात व्हेंटीलेटर व इतर सुविधा नाहित.मा.श्री.भोसले साहेबांनी सुध्दा मागणी केली होती,आपण सुध्दा मागणी केली होती,इथापे साहेब ऑनलाईन आल्यानंतर या विषयावार चर्चा करतो.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- डॉ.बोरगे या बाबत माहिती देवू शकतील.

मा.सभापती साहेब :- डॉ.बोरगे ,माहिती सांगा.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- आपल्याकडे मॅटर्निटी हॉस्पीटल कै.बाळासाहेब देशपांडे आहे,जनरल हॉस्पीटलची आपल्याला नक्की गरज आहे.त्याकरीता जी काही मागील तरतुद आहे.नगररचनाकार,शहर अभियंता व वैदयकीय विभाग आम्ही एकत्रीत बसून प्रस्ताव तयार करून आपल्याकडे सादर करू.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- बोरगे साहेब मी दिनांक ७/०८/२०२० रोजी अर्ज केला होता १४ व्या वित्त आयोगातून किती निधी आपण आरोग्या करीता खर्च केला.कोविडच्या रिलेटेड असतील किंवा इमारत दुरूस्ती असेल.मास्क घेणे,सॅनिटायझर घेणे.आम्हाला वर्तमनापत्रातुन माहिती वाचण्यात आली की,जिल्हानियोजन कडून ३६ लाख रूपये मिळाले.व १६ लाख असे काही तरी ६० लाख यामधून कोठे कोणत्या गोष्टींकरीता किती खर्च केला या बाबत माहिती मिळाली दयावी.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्रत्येक विभागांनी वेगवेळया खर्च ची तरतुद केली आहे.आपण आरोग्य विभागामार्फत मुख्यत्वेकरून जे टेस्टींग होते आपण ते विखेपाटिल हॉस्पीटल बरोबर टायेप केले होते.ज्यावेळी सिव्हील मध्ये सोय नव्हती या काळात एक चार ते पाच हजार टेस्ट आपण त्यांच्या कडून केल्या आहेत.आरोग्य विभागामार्फत तेव्हढा खर्च आपण केला आहे.इतर कोव्हिड केअर सेंटर मध्ये तीन ते चार ठिकाणी जेवण तेथील लोक देत होते.परंतु आनंद लॉन मध्ये जेवणाची व्यवस्था शिव भोजन चे रेट आहेत त्यानुसार एका संस्थेला दिले होते.त्याचे तीन ते पाच लाखाचे बील असेल.एवढाच खर्च आरोग्य विभागामर्फत केला आहे.बाकीचे कंन्स्ट्रक्शनची कामे शहर अभियंता यांचे मार्फत झालेली आहेत.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- मार्च पासून कोवीड चालू झाला आत्तापर्यत साधारण आरोग्य विभागामार्फत कोविड साठी किती खर्च केला.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- बुथ हॉस्पीटल आपणच चालवीत आहे.प्रायव्हेट हॉस्पीटलच्या दरानुसार पैशाची  मागणी केली होती.परंतु शासन निर्णयाप्रमाणे त्यांना आपण पत्र पाठविले आहे.जे काही तुमचे कंन्झुमर्स घेतलेले आहेत.त्यासंदर्भात तुमचे लाईट भाडे असेल,पाणीपट्टी असेल याचा एकत्रीत गोशवारा आम्हाला दया,म्हणजे आम्ही तुमचे बिल अदा करू.इतर कोवीड सेंटर आहेत त्यामध्ये आपले आनंद लॉन होते,गव्हरमेंट पॅलटेक्नीक होते व नटराज आहे यांचे वर मॅक्झीमन १५ ते १६ लाख रूपये खर्च झालेला आहे.या ठिकाणी जेवणाचा खर्च महानगरपालिका करीत नाही.कोवीड साठी जो स्टाफ नेमणूक केली आहे त्याचा आस्थापना खर्च झालेला आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- एकुण किती खर्च केला आहे. पन्नास लाख ,साठ लाख असा

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- आरोग्य विभागामार्फत टेस्टींग साठी एक करोड पंधरा लक्ष असा आहे.विखेपाटील मेडीकल कॉलेज येथील.बाकीचा तीस त पस्तीस लाख असा दिड कोटी रूपये खर्च झालेला आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- किती टेस्टींग किती साठी पेड केले विखेपाटील मेडीकल कॉलेज येथे

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- मा.शासनाचा नियम आहे,शासनाच्या दर आहेत त्याच्या पेक्षा दोनशे रूपये कमी आशा पध्दतीने रेट पे केले आहेत.रेट बदलत गेले ,ज्यावेळी शासन निर्णय नुसार टायेप केले होते त्यावेळी दर २५०० /- रूपये होता.त्याच्या आधी ४२००/- रूपये होता.त्यामध्ये २००/- कमी करून २३००/- रूपये प्रमाणे आपण केले आहे.आणि ज्यावेळी सिव्हील हॉस्पीटल येथे टेस्टींगचे सोय झाली त्यानंतर आपण स्टॉप केले आहे.साधारण तीन आठवडे आपण त्यांची मदत घेतली.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- त्यांना आपण काही पत्र दिले का ? आमचे एक कोटी बील येते तर,आपण सामान्य नगरकरांकरीता आपण करीता आहोत .विखापटील हॉस्पीटलच्या प्रशासनला सुट देणे करीता पत्र दिले नाही   का ? त्यामानानी हे खुप बील झाले आहे.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- दोनशे रूपये पर केस डिसकाउंट दिला आहे.शासनाच्यादरापेक्षा दोनशे रूपये कमी.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- नटराज हॉटेल येथील कोवीड सेंटर येथे महानगरपालिकेने किती खर्च केला ?इतर स्वयंसेवीसंस्थांनी किती खर्च केला या बाबत माहिती सांगा.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- बांधकाम विषयी खर्च झालेला आहे,त्यावर इथापे साहेब बोलतील.बाकी मेडीसीन आपण दिलेले आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ब-याचशा स्वयंसेवीसंस्था म्हणतात आम्ही सुध्दा खर्च केला आहे.आमचे पण त्यामध्ये सहकार्य आहे.आम्ही पण ते सेंटर चालवीतो,नेमकी काय परिस्थीती आहे.बाहेरच्या संस्था खर्च करीता आहे का.त्याबद्दल माहिती सांगा.समाजामध्ये असे होत आहे की,त्या संस्थाच कोवीड सेंटर चालवित आहे.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- यामध्ये संस्थेचे सहकार्य जे आहे.जे नटराज कोवीड सेंटर झाले त्यावेळी काही संस्थे मार्फत एम.आय.डी.सी.मधील कंपनी आहे.त्यांनी आपल्याला कॉट व बेडस दिल्या आहेत.जे काही संचालक आहे त्यांच्यामार्फत जेवणाचा मोफत पुरवठा पेशंट साठी चालू आहे.मेडीसीन आपण देत आहे.आणि बांधकाम विषयी जी दुरूस्ती केली त्या बाबत श्री.इथापे साहेब सांगतील.ते जे हॉटेल आहे त्याला भाडे देत नाही.अधिगृहीत केल्या सारखे आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- त्या ठिकाणीची घरपट्टी किंवा पाणीपट्टी माफ करणे करीता त्यांचा अर्ज आला आहे का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- माझ्याकडे आलेला नाही.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- आपण मास्क व सॅनिटायझार ची किती खरेदी केली आहे.मार्च पासून ऑक्टोबर पर्यत.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- मेडीसीन वगैरे सर्वाचा खर्च रू.२५ लाखांच्या आत आहे.बराचसा साठा आपल्याला गव्हरमेंट कडून आला होता.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- मधंतरी वर्तमान पत्रामध्ये बातमी आली होती आपण मास्क, सॅनिटायझर बाजार भावापेक्षा जास्त दराने घेतले.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- त्याच्या साठी नियमावली आहे.सुरूवातीच्या काळामध्ये ज्यावेळी कोठेच मास्क अॅव्हेलेबल नव्हते त्यावेळी शासनाची नियमावली होती.रू १० पेक्षा कमी असावे.नंतर मुबलक आपल्याला पुरवठा झाला,मास्क घेण्याची आवश्यकता पडली नाही.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- आपण तीन कोटी रूपयांचे एम.आर.आय मशीन घेतले आहे.ते मशीन प्राफेसर कॉलनी जवळील इमारती मध्ये घुळ खात पडले आहे.याकडे आरोग्य विभागाचे लक्ष नाही,ऐवढे तीन कोटी रूपयांचे मशीन आपल्याला मिळाले आहे,हे आपले भाग्य समजावे लागेल आणि आपण त्याचा योग्य प्रकारे वापर करीत नाही.या सारखे दुंभाग्य नसावे.या बाबत काय झाले याची माहिती सदस्यांना दयावी.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- या बाबत मा.महापौर साहेब,उपमहापौर मॅडम,सभापती साहेब ,सर्व अधिकरी ,यांची या विषयासंदर्भात बैठक झालेली आहे.ज्या ठेकेदाराला आपण दिले आहे त्यांना ही आपण बैठकीमध्ये बोलविले होते.आपला जो प्रोजेक्ट आहे तो टर्म की प्रोजेक्ट आहे.म्हणजे ते मशिन आपल्या ताब्यात नाही.टर्म की प्रोजेक्ट म्हणजे त्यांनी आपल्याला सर्व काही कार्यान्वीत करून देणे आहे.तो पर्यत ती कोणतीही वस्तु आपल्या महानगरपालिकेच्या ताब्यात नाही.जी काही एम.आर.आय मशीन आहे.त्या ठेकेदाराने त्या जागेवर आणले आहे.ती मशीन संभाळायची जबाबदारी त्याचीच आहे.ज्यावेळी तो संपुर्ण प्रकल्प आपल्याला करून देणार आहे.त्यावेळेस ती आपल्या मालकीची होईल.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- त्याला काही टाईम,लिमीट असेल ना?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- काल ठेकेदाराची सर्व वरीष्ठ पदाधिका-यांसोबत बैठक झाली.आणी हा जो एम.आर.आय. मशिनचा जो विषय आहे स्वतंत्र्या सोमवारी मा.सभापती साहेब यांच्या कडे सादर करणार आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- लवकरात लवकर कारा नाहीतर या संस्थेला काळया यादीत टाका.असा निधी लॅब्स झाला तर योग्य नाही.आता कोवीडच्या काळामध्ये सिटीस्कॅन,एम.आर.आय. ची अत्यंत गरज आहे.त्याकाळामध्ये आपण अशी सुविधा देवू शकत नसेल तर याच्या सारखी लाजीरवाणी गोष्ट नाही.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- सोमवारी हा विषय सभेसमोर डीटेल मध्ये येईल.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- कोवीड सेंटरची बील अव्वाच्या सव्वा आकारली जात आहे.तशा तुमच्याकडे काही तक्रारी आल्या का? किंवा पालिकेच्या कोणत्या कमीटीने त्या हॉस्पीटल मध्ये जावून चेकींग केले का ?या बाबत माहिती सांगा.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- हा विषय उपजिल्हाधिकारी आहेत निर्मल मॅडम त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती आहे.व लेखा विभागातील ऑडीटर आहेत.ते ऑडीटरर्स भरारी पथकामध्ये नेमलेले आहेत.ती कार्यवाही त्या समितीच्या कार्यकक्षेमध्ये येते.ब-याच लोकांना समितीने रिकव्हरी दाखविली आहे.आणि त्याची वसूली केली जाणार आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- या मध्ये आपण लक्ष दया,ब-याच कोवीड सेंटर मध्ये अंधादुंध कारभार चालू आहे.माझा आणखी एक प्रश्न आहे.महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,हरीत लवाद आहे.त्यांनी पालिकेला दर चाळीस लाख दंड केला होता.एकुण दोन कोटी रूपये दंड झाला होता.असा काही पालिकेला दंड झालेला आहे किंवा आपण भरलेला आहे किंवा काय या बाबत माहिती श्री.पैठणकर साहेब यांनी माहिती दयावी.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- एन.जी.टी.ची तारीख २८ आहे.येत्या २८ तारखेला पुन्हा आपली सुनावणी होणार आहे.आपले चार प्लॉन्ट बुरूडगांव कचरा डेपोला इंस्टॉल झालेले आहेत.एक आह कंम्पोस्टींग चा दुसरा प्लॅन्ट आहे गॅस तयार करण्याचा तीसरा प्लॉन्ट आहे मृत जनावरे जाळण्याचा चौथा प्लॅन्ट आहे जुना कचरा तो दहा पंधरा वर्षापासुन पडलेला आहे तो हटविण्याचा

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- माझा प्रश्न असा आहे.मागची जी तारीख झाली हरीत लावादाची त्यामध्ये महानगरपालिकेला दर महिन्याला रूपये ४० लाख दंड केलेला आहे व तो दोन कोटी दंड आहे.तो पालिकेनी दयायचा असा निर्णय झाला आहे का हरीत लवादाचा.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- तो विषय पाणी पुरवठा विभागाशी निगडीत आहे.घनकचरा विभागाशी निगडती तो विषय नाही.एस टी पी प्लॅन्ट विषया आहे तो.भुयारी गटर योजनेशी निगडीत आहे.

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :- एस टी पी चे काम ५५ % पुर्ण झालेले आहे.कनेक्शन चे काम सुध्दा प्रगती पथापवर आहे.२३ ते २४ % झालेले आहे.डिसेंबर पर्यत ते ७० ते ८०% पर्यत न्यायचे आहे.यामध्ये भिंगारनाल्याची सरकारी मोजणी करणे,जागा ताब्यात घेवून साईडने लाईन टाकणे ही कामे आपण डिसेंबर पर्यत आपण पुर्ण करणार आहोत.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- माझा प्रश्न असा आहे की ,महानगरपालिकेला दोन कोटी दंड हरित लवादाने केला आहे का?

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :- त्या संबंधिती कामे चालू आहेत.या बाबत आम्ही कोर्टा मध्ये प्रतिज्ञापत्र करणार आहोत.आमचे काम प्रगतीपथावर आहे म्हणून

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- आपण काही पैसे भरले आहेत का? किंवा त्या विरूध्द अपिल दाखल केले आहे का?

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :- अपिल आपण करणार आहे.पैसे भरलेले नाहीत.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- निर्णय आठव्या महिन्यामध्ये झाला,अपिल आपण का केले नाही?

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :- त्यासंबंधित काम श्री.काकडे साहेबांनी वकिलांकडे दिलेले आहे.सोमवारी समक्ष बोलावून अपिलाची तयारी करतो.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ते करा दोन कोटी रूपये दंड केला आहे,मागेसुध्दा आपण दंड भरला होता,तुमच्या अधिका-यांमध्ये समन्वय नाही.त्यामुळे पालिकेनी दंड भरायचा व नागरीकांना त्याची अर्थिक झळ बसते.दोन कोटींचा दंड होतो,दोन महिने होवून अपिल करीता नाहीत.याच्या सारखी लाजिरवाणी गोष्ट नाही.

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :- सोमवारी प्रतिज्ञापत्राची व कारणे विमंसा पाहून पुट अप करू.व पुढील सोमवार पर्यत तुम्हाला अहवाल देतो.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- आमच्या वॉर्ड मध्ये अमृत योजनेची लाईन टाकली नाही.

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :- सोमवारी मी संबंधीत ठेकेदार यांना घेवून येतो.

मा.श्री.गणेश भोसले :- पालिकेचे कोवीड सेंटर कोणकोणत्या ठिकाणी चालू आहेत.डॉ.बोरगे माहिती दया.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- आनंद लॉन,गव्हमेंट पॉलटेक्नीक,बुथ हॉस्पीटल नंतर केडगांव येथे काही दिवस चालू केले होते.नटराज हॉटेल,जैन पितळे बोल्डींग, परंतु जसे जसे रूग्णांचा ओघ कमी झाला.त्याबाबत मा.शासनाच्या मार्गदर्शन सुचना आल्या ज्या ठिकाणी आपल्याला एकत्रीत करता येतीलस्टॉफ मोबाईलाईज करता येईल.सेंटर आपण हळूहळू कमी केले आहेत.सुरूवातीला आनंद लॉन कमी केले.केडगांव येथील कमी केले आहे.

मा.सभापती साहेब :- केडगांवच्या कोवीड सेंटर चालू झाल्या नंतर तुम्ही लक्ष दिले नाही.त्या ठिकाणी स्टाफ देण्या बाबत आपल्याकडे मागणी केली होती.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- केडगांव कोविड सेंटर मध्ये ७० ते ८० रूग्ण बरे केले आहेत.अंबिका विदयालया मध्ये हे केंद्र सुरू आहे.रूग्ण संख्या वाढली तर आपण सुरू करू.

मा.सभापती साहेब :- भोसले साहेबांनी विचारलेल्य प्रश्नाचे उत्तर दया.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- पितळे बिल्डींग व नटराज कोवीड सेंटर चालू आहे.या ठिकाणी सुध्दा रूग्णांची संख्या नगन्य आहे. पितळे बिल्डींग येथे ७० बेडचे महिलांकरीता आहे व नटराज येथे १०० बेडचे आहे.आज रोजी नटराज येथे २० ते २२ रूग्ण आहेत.पितळे बिल्डींग येथे ७ ते८ रूग्ण आहेत.मी आत्ता माहिती डॉ.राजुरकरांकडून घेतली. सोमवार पासून गव्हरमेंट पॅलटेक्नीक येथील कोविड सेंटर बंद करावे लागणार आहे.त्याठिकाणी सुध्दा रूग्णसंख्या कमी आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- पॅलटेक्नीक येथील कोवीड सेंटर आपण चालवितो. जे दुसरे चालवितात ते बंद करा.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- १०० बेडचे आहे.परंतु रुग्ण संख्या आठ ते दहा आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- आपले ज्या बरोबर टायेप आहे ते बंद करा.हे आपले वैयत्तीक आहे हे का बंद करता.आपल्याला त्यातुन जबाबदारी झटकायची आहे का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- चालू ठेवता येईल पण पाच ,दहा पेशंट साठी सर्व स्टाफ ठेवावा लागेल.

मा.श्री.गणेश भोसले :- कोणकोणत्या ठिकाणी आहे आपले कोवीड सेंटर.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- नटराज हॉटेल व जैन पितळे येथे

मा.श्री.गणेश भोसले :- म्हणजे आपण आपले बंद करायचे व त्यांचेकडे दयायचे का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- मग आपलेच चालू ठेवू,कोणतेतरी एकच सेंटर चालू ठेवू.

मा.श्री.गणेश भोसले :- वर्तमान पत्रामध्ये ज्यावेळी आले की,एम.आर.आय मशीन पावसात पडून आहे.त्याने महानगरपालिकेची बदनामी होते. त्यावेळी आपण हे सांगायला हवे होते की,या बाबत आपला काही संबंध नाही.काही लोक याची माहिती घेत नाही.ते वर्तमान पत्रामध्ये देतात.त्यामुळे पालिकेची बदनामी होते.तो ठेकेदार आपल्याला हे काम पुर्ण करून आपल्या ताब्यात देईल त्यावेळी आपल जबाबदारी आहे.मशिन पावसात ठेवले काय किंवा कोठे ठेवले त्याच्याशी आपला संबंध नाही.ज्यावेळी तो आपल्या ताब्यात देईल त्यावेळी आपला संबंध येईल.हि गोष्ट आपण सर्वाना सांगीतली पाहिजे.मिडीयाला सुध्दा सांगीतली पाहिजे.माहिती न घेता बातमी येते.पालिकेने एवढया कोटीची मशीन घेतली ती पावसात ठेवली त्यानी चित्र काय निर्माण होते.नागरीकांमध्ये कोणत संदेश जातो.आपल्या विषयी वाईट चित्र जाते.प्रसिध्दी साठी या गोष्टी केल्या जातात.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- त्यावेळी खुलासा केला होता.परंतु हा विषय सोमवारी समिती पुढे डिटेल मध्ये ठेवतो.३१ ऑक्टोबर पर्यत त्याला मुदत दिली आहे.३१ ऑक्टोबर पर्यत तो आपल्याला करून देणार आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- बाकीचे कोवीड सेंटर बंद करा .व आपण चालवित असलेले पॅलटेक्नीक येथील कोवीड सेंटर चालू ठेवा.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- पॅलटेक्नीक येथील कोवीड सेंटर चालू ठेवू.

मा.श्री.गणेश भोसले :- बुथ हॉस्पीटल येथे किती खर्च झाला.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- बुथ हॉस्पीटलने आपल्याला बील दिले होते.सरकारी रेट प्रमाणे प्रयव्हेट हॉस्पीटला देतात तसे आम्हाला दया.त्यांना म्हणल तुम्हाल तसे देता येणार नाही.शासन निर्णया प्रमाणे तुमचा कोणकोणत्या बाबींवर खर्च झालेला आहे.तो आमच्या कडे दया ,आम्ही पैसे देवू.

मा.श्री.गणेश भोसले :- बुथ हॉस्पीटल ची काय मागणी आहे,त्यांनी एकदम चांगले काम केले आहे.सुंदर काम केले आहे.नगर शहरातील नागरीकांचा बुथ हॉस्पीटल वर भरोसा आहे त्यांच्या वर विश्वास आहे.त्यांचे बिल थांबवू नका.त्यांचे काय असेल ते करा.पालिकेच्या वतीने आपण त्यांचे आभार मानले पाहिजे.

मा.श्री.कुमार वाकळे :- आपले कुत्रे पकडण्याचे कॅन्ट्रॉक संपले आहे की चालू आहे.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- ऑफ लाईन

मा.श्री.कुमार वाकळे :- माझ्या प्रभागामध्ये बोल्हेगांव रोड,नगर-मनमाड मुख्य रस्ता ते आंबेडकर चौकापर्यत पाण्याची लाईन घ्यायची आहे.त्या करीता समिती ची मंजूरी घेता येईल का?

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :- कोठे  टाकायची लाईन

मा.श्री.कुमार वाकळे :- आठ इंची पाण्याच्या लाईन करीता आपण म्हणाला होता की स्थायी समिती किंवा महासभेची मंजूरी लागेल त्याला आत्ता मंजूरी घेता येईल का?

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :- आपण प्रस्ताव सभेमध्ये घेतलेला नाही.सविस्तर प्रस्ताव घ्यावा लागेल,कोठून कोठपर्यत,किती इंची,कोणत्या लाईन वरून,प्रस्ताव दाखल नाही.

मा.श्री.कुमार वाकळे :- काम आम्ही लोक वर्गणी मधून करणार आहे.फक्त जी परवानगी आहे,तुम्ही म्हणता की,आठ इंची लाईन करीता स्थायी समिती किंवा महासभेची मंजूरी लागेल.

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :-मुख्य लाईन वरून आपण लाईन घेतो,स्वखर्चाने घेणार असल्याने आपला खर्च वाचणार आहे.लोकांना कनेक्शन मिळतील.त्याप्रमाणे तुम्ही प्रस्ताव किंवा यादी दया.

मा.श्री.कुमार वाकळे :- आत्ता स्थायी समिती सभा चालू आहे.तर लाईन करीता मा.सभापतींची मंजूरी घ्यायची का?

मा.सभापती साहेब :- याच सभेमध्ये परवानगी दयायची का?

मा.श्री.कुमार वाकळे :- हो.आम्ही लोगवर्गणीतुन आम्ही स्वतःखर्च करीता आहे.स्थायी समितीची मंजूरी मिळेल का?

पाणी पुरवठा अभियंता श्री.सातपुते :- चालेल

मा.सभापती साहेब :- याच सभेमध्ये परवानगी देण्यात येत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- कुत्रे पकडण्याचे कॉन्ट्रॅक्ट चालू आहे का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- प्रायोगीक तत्वावर आपण एका संस्थेस दिले आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- पकडलेले कुत्रे कोठे सोडतात ते तुम्ही पाहिले का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- ज्या ठिकाणावरून पकडले आहे त्या ठिकाणी सोडणे अपेक्षीत आहे.संस्थेला एक महिन्या करीता प्रायोगीक तत्वावर दिले आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- किती वाजता ऑपरेशन करतात त्याला काहि वेळ आहे का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- दिवसभर कुत्रे पकडायचे,पिंपळगांव माळवी येथे आपण त्यांना एक ऑपरेशन थिएटर दिले आहे.तीथे त्यांनी ऑपरेशन करणे अपेक्षीत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- किती वाजता करतात.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- दिवसभरात करणे अपेक्षीत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- काल रात्री मला सुडके मळा येथुन फोन आला.ते कुत्रे कोठून तरी धरून आणले होते,ते सुडके मळयातील नव्हते.ते कुत्रे सुडके मळयामध्ये सोडून दिले.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- माहिती घेतो

मा.श्री.कुमार वाकळे :- हे हिंस्त्र झालेले कुत्रे,जे लोकांवर हल्ला करतात,अशे कुत्रे लोकवस्ती मध्ये आणून सोडतात.याचा काय उपयोग होणार आहे.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- माहिती घेतो

मा.श्री.कुमार वाकळे :- माहिती घेवून काय कारवाई करणार.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- हिंस्त्र कुत्र्यांच्या बाबतीत जनावरांच्या डॉक्टरांशी चर्चा करून काय कारवाई करता येईल ते पाहू.

मा.श्री.कुमार वाकळे :- त्या ठिकाणी १० कुत्रे आणून सोडले,आपण कसे ओळखणार हिंस्त्र कुत्रे कोणते आहे.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- शक्यतो त्यांचे म्हणणे असे आहे की,ऑपरेशन केले आणि त्याला रॅबिज चे इंजेक्शन दिले तर त्याचा हिंस्त्रपणा कमी होतो असे त्यांचे म्हणणे आहे.ॲनिमल वेलफेअर बोर्ड चे

मा.श्री.कुमार वाकळे :- लोकवस्तीमध्ये आणून सोडण्याचा कायदा आहे का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- ज्या ठिकाणवरून पकडले आहेत.त्याठिकाणी सोडतात नाहितर दुसरीकडील कुत्रे त्या ठिकाणी त्रास देतात.त्यामुळे जर हे ऑपरेशन करून सोडले तर त्यांच्या पासून धोका नसतो असा कायदा सांगतो.

मा.श्री.कुमार वाकळे :- जे कुत्रे सुडके मळयातील नव्हते,समजा तुम्ही कापडबाजामध्ये कुत्रे धरले ते सुडके मळयामध्ये सोडले तर लोकांचा काय दोष आहे.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- त्या संदर्भात मी माहिती घेतो ,काय झाले मला माहित नाही.

मा.श्री.कुमार वाकळे :- मला काल रात्री फोन आला.सुडके मळयामध्ये रात्रीच्या वेळी कुत्रे सोडले आहेत.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- मी ठेकेदाराला नोटीस देते.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ३७ ते ४० मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेचा विचार करता विशिष्ट बाब म्हणून कै.बा.दे. दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १] रेखा रमेश अमोलिक २] शितल गंगाराम शिंदे ३] तृप्ती रावसाहेब बडे यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील दिनांक १५/७/२०१९ पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनामध्ये ३०% वाढ करून रूपये १३,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती व तदनंतर सदर पुर्ननियुक्तीस अखेर कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

महानगरपालिकेच्या कंत्राटी नर्सेस श्रीमती स्वप्नाली इंगावले,श्रीमती मोहिनी गुंजाळ,श्रीमती शितल शिंदे,श्रीमती तृप्ती बर्डे या परिचारीका मला समक्ष भेटून त्यांनी दिलेल्या अर्जा नुसार त्यांचे मागील सहा वर्षा पासुन मानधनामध्ये वाढ केलेली नाही. सध्या या परिचारीकांची डयुटी कोविड सेंटर मध्ये असून यांच्या दरमहा मानधनामध्ये रक्कम रूपये ३०००/- ने वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार नगर-मनमाड मुख्य रस्त्या लगत असलेल्या मुख्य जलवाहीनीला ८" इंची पाण्याची लाईन जोडण्यास व ती प्रभाग क्रमांक ७ बोल्हेगांव येथील आंबेडकर चौकापर्यत टाकणेस हि सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**
**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम ॲप द्वारे)**

विषय क्रमांक- ३८ शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी राहुल शंकर पडोळे यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- बांधकाम विभाग यांचेकडील जा.क्र.१२७ दि.२७/५/२०२० अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बांधकाम विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग १२७ दि.२७/५/२०२० अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये बांधकाम विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहुल शंकर यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्ती मुदत दि.१०/६/२०२० रोजी पासून सामप्त होणार असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.१३७ दि.१७/१/२०२० च्या पुर्व मंजुरी पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र. आस्था.करारबध्द नेमणूक ५९७ दि.२५/२/२०२० अन्वये बांधकाम विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी राहुल शंकर पडोळे यांची रू.२५,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.१०/१२/२०१९ पासून सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरची मुदत ही दि.१०/६/२०२० रोजी पासुन समाप्त होणार आहे.

सद्यस्थितीमध्ये कोरोना (कोव्हीड-१९) या रोगाचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव होत असल्याने भारतामध्ये सगळीकडे लॉकडाउन करण्यात आलेले आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समितीची बैठक होणेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

तरी बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता विशिष्ट बाब म्हणून वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने राहुल शंकर पडोळे यांची बांधकाम विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.१३/६/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २५,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा.स्थायी समितीच्या मंजुरीस अधिन राहुन नियुक्ती करून तद्नंतर सदर पुर्ननियुक्तीस अखेर कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव पाठविणे बाबत प्रस्ताव मान्य झाल्यास सोबत सदर मानधनावर पुर्ननियुक्तीस बाबतचा आदेश स्वाक्षरीसाठी सादर. /अ

येणेप्रमाणे सहा.आयुक्त आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३(३) मध्ये आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्वमंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशी कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि [लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या] कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीनकरण करता येणार नाही अशाी स्पष्ट तरतुद आहे. विभागाने उक्त तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नसावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषय पत्रीकेतील विषय क्रमांक ३७ ते ४० मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी श्री.राहुल शंकर पडोळे यांची त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.१३/६/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती नियुक्ती करणेस व तद्नंतर सदर पुर्ननियुक्तीस अखेर कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**
**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम अॅप द्वारे)**

विषय क्रमांक- ३९ शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेकिल) व (सिव्हील) यापदी १] स्नेहल राजेंद्र मुळे,२] राहुल सदाशिव गिते, ३] प्रदिप सदाशिव ढगे यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १. पाणीपुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र.१४३२ दि.१२/२/२०२० चा प्रस्ताव

२. पाणीपुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र.१४३३ दि.१२/२/२०२० चा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये की, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.१४३२ व १४३३ दि.१२/०२/२०२० अन्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणीपुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व ( मेकॅनिकल) यापदी दर्शविलेल्या संबंधीतांची मानधनावर नियुक्ती केलेली असुन त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| अ.नं. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दिनांक | नियुक्ती कालावधी | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्नेहल राजेंद्र मुळे | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २५,०००/- | जा.क्र.२०८१ दि.१७/९/२०१९ | २८/८/२०१९ ते २७/२/२०२० अखेर सहा महिन्या करीता | दि.२८/०२/२०२० पासून |
| २ | राहुल सदाशिव गिते | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) | २५,०००/- | जा.क्र.२०८२ दि.१७/९/२०१९ | १३/९/२०१९ ते १२/३/२०२० अखेर सहा महिन्या करीता | दि.१३/०३/२०२० पासून |
| ३ | प्रदिप सदाशिव ढगे | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) | २५,०००/- | जा.क्र.२०८२ दि.१७/९/२०१९ | १३/९/२०१९ ते १२/३/२०२० अखेर सहा महिन्या करीता | दि.१३/०३/२०२० पासून |

सदरची मुदत ही वरील तक्त्यांमध्ये नमुद केलेल्या दिनांकापासून समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील पुर्ननियुक्ती करणेबाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची तीन दिवसांच्या तांत्रिक खंड देवुन दि.०२/०३/२०२० पासून सहा महिनयाकरिता व राहुल सदाशिव गिते, प्रदिप सदाशिव ढगे यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.१६/३/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २५,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्य लेखा अधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./ अ

येणेप्रमाणे सहा. आयुक्त आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" मान्यतेस हरकत नसावी.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र मनपा अधि.कलम ५३(३) मध्ये आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्वमंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशी कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही.अशी तरतुद आहे.उक्त तरतुदीनुसार विभागाने निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, पाणी पुरवठा विभागाकरिता सहा महिन्यांसाठी मानधनावर पुर्ननियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, तीन (३) महिने वाढ

**ooo**

संदर्भ- १. पाणीपुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र.१४३२ दि.१२/२/२०२० अन्वयेचा प्रस्ताव

२. पाणीपुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र.१४३३ दि.१२/२/२०२० अन्वयेचा प्रस्ताव

३. पाणी पुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र.पाणीपुरवठा विभाग ४० दि.१९/५/२०२० अन्वये कार्योत्तर मंजुरीस अधिन राहुन पुर्नेनेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव

फेरसादर,

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणीपुरवठा यांनी त्यांचेकडील जा.क्र.पाणी पुरवठा विभाग१४३२ व१४३३ दि.१२/०२/२०२०अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये पाणीपुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची दि.२८/८/२०१९ ते २७/२/२०२० अखेर असुन त्यांची मुदत दि.२८/२/२०२ पासून समाप्त होत असल्याने व तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदी १. राहुल सदाशिव गिते ,२. प्रदिप सदाशिव ढगे यांची दि.१३/९/२०१९ ते १२/३/२०२० अखेर असुन त्यांची मुदत दि.१३/३/२०२० पासून समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले होते.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.१८ दि.२७/६/२०१९ च्या पुर्व मंजुरी पारित ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक २०८१ व २०८२ दि.१७/९/२०१९ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार स्वरूपात स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व ( मेकॅनिकल) यापदी संबंधीतांची दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन अनुक्रमे दि.२८/८/२०१९ व १३/९/२०१९ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही अनुक्रमे दि.२८/२/२०२० व दि.१३/३/२०२० रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

संदर्भिय प्रस्ताव क्र.१ व २ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आस्थापना विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला असता मा.आयुक्त यांचे दि.२८/३/२०२० रोजीच्या शेरांकनानुसार संबंधीतांची तीन महिन्याकरीता मानधनावर नियुक्तीस पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

तथापी सद्यस्थितीमध्ये कोरोना (कोव्हीड-१९) या रोगाचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव होत असल्याने भारतामध्ये सगळीकडे लॉकडाउन करण्यात आलेले आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समितीची बैठक होणेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

तरी पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता विशिष्ट बाब म्हणुन वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.०२/०३/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता व २) राहुल सदाशिव गिते ३) प्रदिप सदाशिव ढगे यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.१६/३/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २५,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत मा.स्थायी समितीच्या मंजुरीस अधिन राहुन नियुक्ती करून तद्नंतर सदर पुर्ननियुक्तीस अखेर

कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव पाठविणेबाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मान्य झाल्यास सोबत सदर मानधनावर पुर्ननियुक्ती बाबतचा आदेश स्वाक्षरीसाठी सादर./अ

येणेप्रमाणे सहा.आयुक्त यांचा फेरसादर असे

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, स्थायी समितीच्या कार्योत्तर मंजूरीस अधिन राहून मान्यतेस हरकत नसावी.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३(३) मध्ये आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्वमंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशी कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही.अशी तरतुद आहे.उक्त तरतुदीनुसार विभागाने "अ" बाबत निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषय पत्रीकेतील विषय क्रमांक ३७ ते ४० मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.०२/०३/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता व २) राहुल सदाशिव गिते ३) प्रदिप सदाशिव ढगे यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.१६/३/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस व अखेर कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**
**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम अॅप द्वारे)**

विषय क्रमांक- ४० शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

प्रस्तावाचा मजकूर :- अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग ४६३ दि.६/१/२०२० चा प्रस्ताव

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.इलेक्ट्रीक ४६३ दि.०६/०१/२०२० अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये इलेक्ट्रीक विभागकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुकतीचा कालावधी दि.१९/८/२०१९ ते १८/२/२०२० अखेर असुन सदरची मुदत ही दि.१९/२/२०१९ रोजी पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.७४ दि.९/९/२०१९ च्या पुर्व मंजुरी पारित ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ३०२७ दि.३०/११/२०१९ अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची रू.१४,२५०/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.१९/८/२०१९ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि.१९/२/२०२० रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने आस्थापना विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात येवुन मा.आयुक्त यांचे दि.४/३/२०२० रोजीच्या मान्यतेनुसार संबंधीतांची सहा महिन्याकरीता मानधनावर नियुक्तीस पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

सद्यस्थितीमध्ये कोरोना (कोव्हीड-१९) या रोगाचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव होत असल्याने भारतामध्ये सगळीकडे लॉकडाउन करण्यात आलेले आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समितीची बैठक होणेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

तरी इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता विशिष्ट बाब म्हणुन वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने गायकवाड अरविंद शामराव यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.२२/२/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत मा.स्थायी समितीच्या मंजुरीस अधिन राहुन नियुक्ती करून तदनंतर सदर पुर्ननियुक्तीस अखेर कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव पाठविणे बाबत मा.मुख्यलेखाधिकारी व मा. मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मान्य झाल्यास सोबत सदर मानधनावर पुर्ननियुक्ती बाबतचा आदेश स्वाक्षरीसाठी सादर./अ

येणेप्रमाणे सहा.आयुक्त,आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्य लेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, स्थायी समितीच्या कार्योत्तर मंजूरीस अधिन राहून मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३(१) (३)मध्ये सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.अशी स्पष्ट तरतुद आहे. उक्त तरतुदीनुसार विभागाने 'अ' बाबत निर्णय घ्यावा

यावर मा.उपायुक्त (सा.)साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषय पत्रीकेतील विषय क्रमांक ३७ ते ४० मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात गायकवाड अरविंद शामराव यांची वायरमन यापदी मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.२२/२/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे व तदनंतर सदर पुर्ननियुक्तीस अखेर कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

मा.स्थायी समिती कडे ॲड.अभिषेक विजय भगत यांचा महानगरपालिकेच्या ॲडव्होकेट पॅनलमध्ये समावेश करणे बाबतच्या प्राप्त अर्जा नुसार त्यांचा कामाचा अनुभव पहाता त्यांची महानगरपालिकेच्या वतीन मा.न्यायालयामध्ये दाव्यासंदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार(विधीतज्ञ) यापुर्वीच्या मानधनानुसार (प्रति विधीज्ञ रक्कम रूपये १०,०००/-प्रमाणे ) मानदविधीज्ञ म्हणून नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम ॲप द्वारे)**

विषय क्रमांक- ४१ शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपलिका बुरूडगांव स.नं. ३४ येथे ५ KLD क्षमतेचा ETP दुरूस्त करणे बाबत महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) क अन्वये च्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

संदर्भ- १. मा. राष्ट्रीय हरित लवाद यांचे दिनांक २७/१०/२०१७ चे आदेश

२.प्रदुषण नियंत्रण मंडळ अधिकारी यांचा दिनांक २७/०८/२०२० रोजीचा Visit Report

३. आरोग्याधिकारी, घनकचरा व्यवस्थापन (प्रकल्प) विभाग यांचे दिनांक ०३/०९/२०२० चे पत्र

उपरोकत संदर्भिय विषयाबाबत सादर करण्यात येते की, बुरूडगाव स.नं.३४ येथे ५KLD क्षमतेचा ETP विकसीत करण्यात आलेला आहे. सदरचे काम दिनांक १८/०३/२०१८ रोजी पुर्ण करण्यात आले होते. बुरूडगावं स.नं.३४ येथील कचरा प्रक्रिया प्रकल्प २०१८ पासून बंद करण्यात आला व सावेडी येथील प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला. यास्तव बुरूडगांव ५KLD क्षमतेचा ETP प्रकल्प मागील दोन वर्ष बंद अवस्थेत होता त्यामुळे सदर ठिकाणी असलेल्या पंप ना दुरूस्त झालेला आहे व इलेक्ट्रीक मोटारची servicing , varnishing and heating लागणार आहे. तसेच Blowers देखील दुरूस्ती करावी लागणार अहे. या व्यतिरिक्त काही केमिकल्स देखील पुरवठा करावा लागणार आहे. सदर बाबत ETP विकसीत करणे बाबतच्या कामाबाबतचा अनुभव असलेली एजन्सी ग्लोबल एन्विरोस, पनवेल नवी मुंबई यांचेकडून प्रकल्पाचे इन्सपेक्शन करून घेण्यात आले व सदर एजन्सीने खालील प्रमाणे ETP दुरूस्ती बाबत अंदाजपत्रक सादर केले आहे.

| sr. o. | Description | Unit | Qty. | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | cleaning of th site | LS | 1 | 3000.00 | 3000.00 |
| 2 | servicing of all pumps with required spares | Nos. | 7 | 2500.00 | 17500.00 |
| 3 | servicing of Air Bolwers with required spares | Nos. | 2 | 4500.00 | 9000.00 |
| 4 | servicing of motors by varnishing and heating and replacement of bearings | Nos. | 8 | 1500.00 | 12000.00 |
| 5 | Supply and laying of incoming cable for electric supply (16 sqmm Al Armoured) | Mtr. | 300 | 150.00 | 45000.00 |
| 6 | Supply of Bio-culture | Kgs | 20 | 1000.00 | 20000.00 |
| 7 | Supply of Hydrated Lime (90%) | Kgs | 250 | 25.00 | 6250.00 |
| 8 | Supply of Ferric Alum | Kgs | 300 | 28.00 | 8400.00 |
| 9 | Supply of Hypochlorite | Ltrs. | 150 | 115.00 | 17250.00 |
| 10 | Commissionihg of ETP by deputing our Operator (A Operater chages as per PWD DSR For 30 days) | Days | 30 | 539 | 16170.00 |
| 11 | Transport | LS | 1 | 3500.00 | 3500.00 |
| | | | | Total | 158070.00 |
| | | | | GST@ 18% | 28452.00 |
| | | | | Grand Total | 186522.00 |

सदर बाबत बुरूडगांव स.नं.३४ येथील कचरा डेपो बाबत राष्ट्रीय हरित लवाद येथे दावा चालू आहे. त्यानुसार संदर्भ क्र. १ अन्वये मा.राष्ट्रीय हरित लवाद यांचे आदेशानुसार बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी निर्माण होणारे लिचेटवर प्रक्रिया करणे करीता ETP विकसीत करण्यात आलेला आहे. संदर्भ क्र.२ अन्वये दि.२७/८/२०२० रोजी प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे अधिकारी यांनी बुरूडगांव येथील कचरा प्रक्रिया प्रकल्पाबाबत पहाणी केली असता सदर ठिकाणी असलेल्या ETP प्रकल्प त्वरीत चालू करणे बाबत सुचना दिलेल्या आहेत. सदर बाबत संदर्भ क्र.३ अन्वये आरोग्याधिकारी यांचे दि.०३/०९/२०२० च्या पत्रान्वये ETP तातडीने दुरूस्त करून देणेबाबत कळविण्यात आले आहे. मा.राष्ट्रीय हरित लवाद यांची पुढील तारीख १७/९/२०२०रोजी आहे तत्पुर्वी बुरूडगांव येथील सर्व प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वीत करून मनपास लवादाकडेस प्रतिज्ञापत्र सादर करावयाचे आहे.

यास्तव सदरचे ETP दुरूस्तीचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने व निविदा प्रक्रिया केल्यास त्यास विलंब लागण्याची शक्यता आहे. यास्तव महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क अन्वये मा.आयुक्त यांचे अधिकारामध्ये ग्लोबल एन्विरोस, पनवेल नवी मुंबई यांचेकडून काम करून घेण्यास व सदरच्या खर्चास रक्कम रूपये १,८६,५२२/- मंजुरी मिळणेस्तव सविनय सादर व सदर खर्चा विषयीची प्रतीवृत्त मा.स्थायी समिती व महानगरपालिका यांचेकडे सोबतच्या मसुदया पाठविण्यास मान्यतेस सादर./अ

येणेप्रमाणे उपअभियंता, प्रकल्प विभाग यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाही बाबत मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्रायकी, NGTकेसच्या अनुषंगाने तात्काळ दुरूस्ती करणे आवश्यक असले करणाने एका आठवडयात दुरूस्त होईल याची दक्षता घ्यावी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

सभापती साहेब :- विषय क्रमांक ४१ चे वाचन करा.

त्यानुसार सभेमध्ये विषय क्रमांक ४१ चे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे साहेब माहिती सांगा

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- बुरूडगांव कचरा डेपो येथे आपण ETP प्रकल्प केला होता.तो कार्यान्वीत करून घेतला आहे.एन.जी.टी.ची ऑर्डर मुळे तो वेळेत करून घेवून मा.आयुक्त साहेब यांच्या मंजूरीने त्याचा १ लाख ८७ हजार त्याचा खर्च आहे.ते काम करून घेण्यात आले होते.अंतीम मंजूरी साठी स्थायी समिती कडे विषय सादर केला आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- आपण कच-यावर प्रक्रिया करतो तो किती क्षमतेचा प्लॅन्ट आहे.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- १०० मे.टन प्रति आठ तास या क्षमतेचा प्रकल्प आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- आपल्या नगर शहराचा किती टन कचरा निघतो.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- १६० च्या दरम्यान निघतो.

मा.श्री.गणेश भोसले :- १६० टनाची पुर्ण प्रक्रिया होती का?

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- हे तो ओव्हर कपॅसिटी रन करतो .क्षमता १०० मे.टन आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- माझा साधा प्रश्न आहे.पुर्ण प्रक्रीया होती का कच-याची.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- हो ,प्रोसेसिंग करता तो.

मा.श्री.गणेश भोसले :- म्हणजे पुर्ण प्रक्रिया होती.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- आलेला सर्व कचरा सेड मध्येच येतो प्रोसेसिंग साठी

मा.श्री.गणेश भोसले :- माझा प्रश्न आहे.रोज १६० मे.टन कचरा निर्माण होतो त्याची प्रोसेसिंग होती का?

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- हो होती.

मा.श्री.गणेश भोसले :- जर होत असेल तर मला चेअरमन साहेब व मी येता १६० टन कचरा प्रक्रिया करून दाखवता का?

मा.सभापती साहेब :- आपण पहाणी करू.

मा.श्री.गणेश भोसले :- सभापती साहेब तुम्हाला सुध्दा माझी विनंती आहे.आपण सर्व सदस्य जावून पाहू कि खरेच १६० टन कच-यावर प्रक्रिया होती का. मी थंबतो दिवसभर त्या ठिकाणी,नगरशहरामध्ये रोज निर्माण होणा-या कच-यावर त्यांनी प्रक्रिया करून दाखवावी.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- एम.पी.सी.बी.चे लोक पहायला येणार आहेत आपण त्या दिवशी व्हिजीट करू शकता.

मा.श्री.गणेश भोसले :- शहराचा कच-यावर प्रक्रीया होत असेल तर नविन प्लॉन्ट लावण्याची आवश्यकता नाही.

मा.सभापती साहेब :- दोन तीन दिवसांमध्ये व्हिजीट करू.

मा.श्री.कुमार वाकळे :- महानगरपालिकेमध्ये तीन वर्षापासुन छत्रपती शिवाजी महाराज जे आपले आराध्य दैवत आहे.महाराष्ट्राचे आपले भुषण आहे.आणि त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाची परवानगीचे काय झाले ते मला सांगा.त्यामध्ये काय अडचण आहे.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- प्रस्ताव पोलिस अधिक्षकांकडे पाठविला त्यानंतर,शहराचे डि.वाय.एस.पी.यांना जागा प्रत्यक्ष जागा दाखविली.त्यांनी सहमती दाखवून, आम्ही तुम्हाला मंजूरी देतो परंतु दरम्यानच्या काळामध्ये एस.पी.मोहोदयांकडून पत्र असे आले की,गेल्या पंधरा दिवसांपुर्वी ,तुम्ही तुमचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करा.ते आम्हाला विचारणा करतील मग ती एन.ओ.सी .आपणाला देवू.म्हणून आम्ही मग त्यांच्या पत्रा नुसार मा.जिल्हाधिकारी महोदयांकडे पत्र पाठविले आहे.दोन्ही पण पत्र आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा आपल्या आवारा मध्ये व छत्रपती संभाजी महाराजांचा प्रोफेसर कॉलनी चौकामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामधून चौदा मुद्दे उपस्थित करून आपल्याला पत्र मिळाले आहे.त्या मुद्दयांची पुर्तत करण्याचे काम सुरू आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणे व संभाजी महाराजांचा पुतळा बसविणे हे दोन वेगळे विषय ठेवा जेणे करून संभाजी महाराजांचा पुतळयाला त्या ठिकाणी बसविण्यास काही नागरीकांचा विरोध आहे,प्रोफेसर चौका मध्ये.आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा,आपल्या महानगरपालिकेच्या जागेत बसविणार आहे.त्यामुळे त्या फाईल मुळे ही फाईल अडकायला नको.हा मार्ग आपला सुटसुटीत आहे.आपण त्या पध्दतीने सिंगल फाईल चा पाठपुरावा करता येईल.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- आम्ही तसाच प्रस्ताव दिला होता.त्यांना जागाही दाखविली होती.महानगरपालिकेच्या आवारामध्ये सुरक्षित ठिकाणी आहे.महानगरपालिकेचे प्रशासकिय कार्यालय आहे.या सर्व गोष्टी पाहुन आपण प्रस्ताव दिला होता.

मा.श्री.कुमार वाकळे :- या मध्ये कोणकोणते मुद्दे मा.जिल्हाधिकारी साहेबांनी दिले आहेत.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- काही मुदयांमध्ये त्यांनी मा.शासनाची परवानगी मागीतली.काही प्रतिज्ञापत्र आहेत.आपले प्रमाणपत्र मागीतले आहेत.आम्ही रिपोर्ट तयार केला आहे.दोन ते तीन दिवसांमध्ये तो मा.आयुक्त साहेब यांच्याकडे जाईल.आपल्या पातळीवर जी पुर्तता करायची की,पुतळयाच्या संरक्षणाची हमी आपण घेणार आहे.अशा मुदयांची पुर्तता करून आम्ही जील्हाधिकारी साहेबांकडे फेरप्रस्ताव

पाठवित आहे.आणि मा.शासनाच्या तीन परवानग्या त्यांनी मागीतल्या आहेत.आपल्या महानगरपालिकेच्या संबंधित मंत्रालयाचे एक एन.ओ.सी.त्यांनी मागीतली आहे.नगरविकास विभागाकडे आपण प्रस्ताव देणार आहोत.दुसरी कला संचनालयाची परवानगी आणि राज्य शासनाचे जे वास्तु विशारद आहेत यांची एक परवानगी लागणार आहे.शासन पातळीवर तीन परवानगग्याआपल्याला लागणार आहेत.बाकीची पुर्तता आपण आपल्या महानगरपालिकेच्या स्तरावर करणार आहोत.

मा.श्री.कुमार वाकळे :- आपल्या शहराचे आमदार मा.संग्रामभैय्या जगताप यांचेशी माझे बोलणे झाले आहे.ते म्हणाले महानगरपालिकेकडून मला परवानगीसाठी दिले तर मी सन्माननीय त्या खात्याच्या मंत्रीमोहोदयांना भेटून आपली महाराष्ट्र शासनाची परवानगी मी घेवू शकतो.आपल्या कडून तसा काही प्रयत्न झाला आहे का?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- मा.जिल्हाधिकारी साहेबांचे अत्ताच पत्र मिळाले आहे.त्यामुळे मा.शासनाकडे अदयाप काही पत्र गेले नाही.मा.शासनाकडे पत्र गेल्यानंतर आपण शहराचे आमदार महोदय यांना विनंती करू,त्यांना आपणकेलेल्या पत्र व्यवहाराच्या प्रति देवू.त्यानंतर आमदार साहेब आपल्याला मदत करतील.

मा.श्री.कुमार वाकळे :- मा.आमदार साहेबांना आपण पत्र दिले पाहिजे,

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- चालेल आपण मा.आमदार साहेब यांना पत्र देवू व विनंती ही करू.

मा.श्री.कुमार वाकळे :- पत्र केव्हा जाईल

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- मा.शासनाला पुढील आठवडयात जाईल,आमचा रिपोर्ट तयार आहे.सर्व अधिका-यांच्या सहया व मा.आयुक्त साहेब यांची मान्यता घेवून मा.शासनाकडे पुढील आठवडयात पत्र जाईल.

मा.श्री.कुमार वाकळे :- सर्व अधिकारी एका बिल्डींग मध्ये आहेत.त्यांची मान्यता घ्यायला इतका वेळ लागला नाही पाहिजे.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- उदया शनिवार ,रविवार सुट्टी आहे.सोमवार नंतर लवकरात लवकर करून घेतो.

मा.श्री.कुमार वाकळे :- कोणत्या अधिका-यांचा पुतळयाला विरोध आहे का?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- नाही,विरोध असण्याचे काही कारण नाही.सर्व अधिकारी सहकार्य करतात.

मा.श्री.कुमार वाकळे :- अधिका-यांमध्ये उत्साह दिसुन येत नाही.चार वर्ष झाले.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- मा.शासनाच्या पुतळा बसविण्याबाबतच्या गाईड लाईन्स अतिशय कडक आहेत.

मा.श्री.कुमार वाकळे :- पुणे जिल्हामध्ये,सातारा ,सोलापुर मध्ये विस ते तीस फुटांचे छत्रपती महाराजांचा पुतळा रोडवर बसविले आहेत.आपण तर आपल्या कंम्पौडमध्ये बसवितो आहे.आपल्या जागेत बसवितो आहे.तिथे आपला वॉचमन २४ तास आहे.तीथे लाईट ची सुविधा आहे.तिथे सी.सी.टि.व्ही.ची सुविधा आहे.मग आपल्याला इतकी अडचण यायला नाही पाहिजे.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- आपण एकत्रीत ,तुमचे सहकार्य घेवू,मा.आमदार साहेबांची मदत घेवू,आणि हा विषय लवकर मार्गी लावू.

मा.श्री.कुमार वाकळे :- शिवप्रेमींच्या भावना आपण लक्षात घ्या.दरवेळेस कायदयाचा आदर सर्व जण करतात.त्यामुळे आपण असे काही पाउल उचलले नाही.आणि ते उचलायचे नाही.जर आपण चार-चार वर्षा पुतळयाला मंजूरी मिळाली नाही.मा.महासभेने मंजूरी दिलेली आहे.

मा.सभापती साहेब :- इथापे साहेब,हा प्रश्न लवकरात लवकर मार्गीलावा.मा.कुमार भाउंचा, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याकरीता जो प्रयत्न चालू आहे.तो विचारात घेवून लवकरात लवकर त्या ठिकाणी पुतळा बसविण्यात यावा.

मा.सौ.सोनाली चितळे :- छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या कामाला गती दया.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- हो,या कामास गती देतो ,पुतळा लवकरात लवकर बसवू.

मा.सौ.सोनाली चितळे :- शहरातील महानगरपालिकेच्या शाळांच्या रूम आपण अनेक ठिकाणी भाडेतत्वावर दिल्या आहेत.नालेगांव गाडगीळ पटांगण येथील आपल्या शाळेच्या इमारती मध्ये दोन रूम आहेत.त्या माळीवाडा व नालेगांव तलाठी ऑफिस करीता दिलेल्या आहेत.त्याचे अनेक वर्षा पासून भाडे थकलेले आहे.त्यांचेकडून एक रूम रिकामी करून घेवून ती विठ्ठल रूख्म्ीणी बचत गटाला दयावी.दोन रूम मधील ऑफिस एका रूम मध्ये शिफ्ट करून एक रूम विठ्ठल रूख्म्ीणी बचत गटाला दयावी.कोरोना,लॉकडाउन मुळे वसुलीवर परिणाम झालेला आहे.गटास भाडेतत्वावर दिल्यास उत्पन्नास भर पडणार आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- चितळे ताईनी जो विषय घेतला तो बरोबर आहे.,या व्यतीरीक्त किती खोल्या आहेत.कोणाकोणाला कित्तेक वर्षापासुन लाखो रूपये भाडे थकीत आहे.त्यांचेकडील भाडे का वसूल करीत नाही.इतके भाडे थकले तरी त्यांच्याकडून त्या रूम का काढून घेतल्या नाही.त्यांच्यावर केसेस का केल्या नाही.आपण किती जणांना खोल्यादिल्या त्या बाबत मी तुमच्याशी बोलतो,हे सर्व माहित असतांना ,त्यांच्याकडे लाखो रूपये थकीत असतांना, त्यांच्या वर कारवाई होत नाही.एखादया नागरीकाची पाणपट्टी थकली तर तुम्ही त्याचे नळ कनेक्शन कट कराता.ज्यांनी मागणी केली आहे,त्यांना त्या खोल्या देण्यात याव्यात.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने यामधील एक खोली विठ्ठल रूख्मीणी बचत गटास बहुउद्देशीय कामाकरीता भाडेतत्वावर देण्यात येत आहे.

मा.सौ.सोनाली चितळे :- तलाठी कार्यालयाकडून आजपर्यतची वसूली करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मा.भोसले साहेब ,आपण या विषयावर चर्चा करू व विषय मार्गी लावू.

मा.श्री.गणेश भोसले :- लाखो रूपये थकीत आहेत ,यांच्या कडे.

मा.सभापती साहेब :- ब-याच ठिकाणच्या शाळा बंद आहेत.त्यांच्या भिंती पडायला लागल्या आहेत.या सर्व गोष्टींचा विचार करून या विषयावर बैठक आयोजित करू.त्यामध्ये योग्य तो निर्णय घेवू.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- पुढच्या मिटींग मध्ये या बाबतची सर्व माहिती कमीटी पुढे ठेवणे बाबत रोलिंग दया,आदेश दया.

मा.सभापती साहेब :- पंधरा दिवसांमध्ये या सर्व गोष्टींची माहिती घेवून बैठक घेवू.विषय मंजूर.

मा.श्री.सागर बोरूडे :- मला इथापे साहेब यांना प्रश्न विचारायचा आहे.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- डॉ.साहेब बोला.

मा.श्री.सागर बोरूडे :- कोविड संबंधात बांधकाम विभागामार्फत मार्च ते ऑक्टोबर किती खर्च करण्यात आला.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- सर्वसाधारण पणे ४० ते ४५ लाख खर्च आहे.सर्व बीले गेलेली नाहीत.बॅकेकेटींग करणे व कंन्टेंन्मेंट झोन करीता सर्व साधारणपणे एवढा खर्च अपेक्षीत आहे.

मा.श्री.सागर बोरूडे :- नटराज हॅाटेलच्या दुरूस्तीकरीता आपण किती खर्च केला आहे.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- खर्च केला आहे.अदयाप बिल पेड झालेले नाही.सर्वसाधारणपणे ८ते ९ लाख रूपये खर्च आहे.

मा.श्री.सागर बोरूडे :- मागे स्थायी समिती मध्ये मागणी केली होती की,महानगरपालिकेचे अदयावत हॅास्पीटल उभारण्यात यावे.बांधकाम विभागामार्फत अशी कोणती इमारत देता येईल का?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- अदयाप काही सर्व्हेक्षण केले नाही.तसा काही प्रस्ताव दिला नाही.

मा.श्री.सागर बोरूडे :- महानगरपालिकेची बंद पडलेली शाळा असेल,कुठली इमारत असेल आपल्याला अदयावत रूग्णालय उभारता येईल.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- विरोधी पक्ष नेते श्री.बारस्कर साहेबांनी एक पत्र दिले आहे.सावेडी भागामध्ये एक अदयावत रूग्णालय उभारावे.त्याकरीता आम्ही नगररचना विभगाशी पत्रव्यवहार केला आहे.विचारणा केली आहे की,हॉस्पीटल करीता एखादा आरक्षीत एखादा भुखंड आहे का? आणि कुठे आपण हॉस्पीटल उभारूशकतो.याची तांत्रीक माहिती घेवून मग आम्ही आर्कीटेक कडून त्याचे डिटेल ड्रॉइंग व एस्टीमेंट बनवू या करीता निधीची आवश्यकता लागेल व मोठा भुखंड लागेल.

मा.श्री.सागर बोरूडे :- माझ्या वॉर्ड मध्ये भिस्तबाग चौक ते महाल रस्ता आहे.तेथे चेंबरच्या मधून पाण्याची लाईन होती.पाण्याच्या लाईन मधून चेंबर बांधले आहे.तुम्ही ते पाहिले आहे.ठेकेदारावर कारवाई केली का?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- ते आपण काढायला लावू.जागा बदलून बांधकाम करायला लावू.

मा.श्री.सागर बोरूडे :- काही कॉक्रीटचे रोडचे काम होवून एक वर्ष देखील झाले नाही तरी त्यारस्त्याचा वरचा थर निघून गेला आहे.त्या बाबत आपण काही कारवाई केली का?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- संबंधित ठेकेदाराला नोटीस काढलेली आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- सर्व सदस्यांनी मुरूमाची मागणी केली होती.त्यावर काय उपाययोजना केली?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- मा.आयुक्त साहेबांची मान्यता घेवून स्टोअर विभगामार्फत मुरूम खरेदी करण्याची कार्यवाही चालू आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :-मा.सभापती साहेब,ज्याप्रमाणे आपली अमृत योजनेच्या समन्वयक पदी नेमणूक झाली.त्याप्रमाणे मा.कुमार वाकळे यांची छत्रपती शिवाजी महाराज पुतळा बसविणे बाबत समिती करून त्यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करावी.अधिकारी काय करतात.पुतळा बसविणे करीता वेगवेगळया परमिशन घेण्याची आवश्यकता आहे.वाकळे साहेबांनी सांगीतले कि,आम्ही मा.आमदारांमार्फत किंवा इतर मंत्री असतील यांच्या मार्फत त्या सर्व परवानग्या घेवू शकतो.तर मा.कुमार वाकळे यांची छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समिती स्थापन करून त्यांची समन्वयक पदी नियुक्ती करावी.

मा.सभापती साहेब :- मा.श्री.कुमार वाकळे यांची छत्रपती शिवाजी महाराज पुतळा बसविणे समितीच्या समन्वयक पदी नियुक्ती करण्यात येत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- सभापती साहेब,मी सर्वाचे आभार मानतो.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा बसविणे करीता या चांगल्या कामा करीता माझी समन्वयक म्हणून नियुक्ती केली त्या बद्दल मी आभार मानतो.

सावेडी ते बोल्हेगांव या रोडवरील सिनानदीवर एक पुल आहे.या पुलाची दुरआवस्था झालेली आहे.हा पुल मोडकळीस आलेला आहे.एखादी मोठी गाडी गेल्यास मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.आपणास विनंती आहे की,शहर अभियंता श्री.इथापे साहेब यांना अशी सुचना देण्यात यावी,लवकरात लवकर त्या पुलाची डागडूजी का होईना करावी.नविन पुला करीता मोठा खर्च आहे.त्या करीता निधीची तरतुद आपल्याला करावी लागेल.लवकरात लवकर त्याची डागडूजी झाली पाहिजे.असा आदेश आपण बांधकाम खात्याला दयावा.हि आपणास विनंती आहे.जेणे करून सावेडी बोल्हेगांव मध्ये ज्या नागरीकांना जावे लागते.आपण पाहा पावसामुळे हा पुल संपुर्ण पुल खचलेला आहे.अपण पहाणी करून,तसे पहाता आपण नविन पुल करण्याची मागणी करणार आहे.सध्या पुरते बांधकाम खात्यास हा पूल डागडूजी करणे बाबत आपण बांधकाम खात्यास आदेश दयावे हि विनंती आहे.

मा.सभापती साहेब :- पुलाची किरकोळ दुरूस्ती करण्यात यावी.

मा.सौ.आशा कराळे :- मा.श्री.कुमार वाकळे यांनी सुचविलेली सर्व कामे करावीत.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपलिका बुरूडगांव स.नं. ३४ येथे ५ KLD क्षमतेचा ETP दुरूस्तीचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने यास्तव महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क अन्वये मा.आयुक्त यांचे अधिकारामध्ये ग्लोबल एन्विरोस, पनवेल नवी मुंबई यांचेकडून काम करून घेण्यास व यास्तव येणा-या रक्कम रूपये १,८६,५२२/- खर्चा विषयीचे प्रतीवृत्त मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने .नालेगांव गाडगीळ पटांगण येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळेच्या इमारती मध्ये दोन खोल्याआहेत.सदर खोल्या माळीवाडा व नालेगांव तलाठी ऑफिस करीता भाडेतत्वावर दिलेल्या आहेत.त्यांचेकडून एक खोली रिकामी करून घेवून ती विठ्ठल रूख्मीणी बचत गटाला दयावी व दोन रूम मधील तलाठी कार्यालय एका खोली मध्ये शिफ्ट करून एक खोली विठ्ठल रूख्मीणी बचत गटाला अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे,नगरसेवक तथा सदस्य,स्थायी समिती यांची छत्रपती शिवाजी महाराज पुतळा महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीच्या प्रंगणामध्ये बसविणे बाबत समितीवर समन्वयक म्हणून नियुक्तीस मान्यता देत आहे.या बाबतची सर्व कार्यालयीन सोपस्कार प्र.शहर अभियंता,बांधकाम विभाग,मनपा यांनी पार पाडावेत.

सावेडीगांव ते बोल्हेगांव या रोडवरील सिनानदीवरील पुलाची दुरावस्था व पुल मोडकळीस आलेला असल्याने सदरपुलाची किरकोळ स्वरूपाची दुरूस्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा.सदस्य,स्थायी समिती श्री.मुदस्सर शेख यांनी मा.सभापती साहेब यांच्याकडेस दिलेल्या अर्ज व पत्रा नुसार श्री.लतीफ मकबुल तांबोळी यांची महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील हायड्रोलीक वाहनावर वाहनचालक आवश्यक असल्याने त्यांची या वाहनावर वाहनचालक या पदी तात्पुरत्या स्वरूपात मानधावर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**
**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम अॅप द्वारे)**

विषय क्रमांक- ४२ शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाअंतर्गत पथदिवे देखभाल दुरूस्तीकरीता मा.नगरसेवक स्वेच्छा निधीमधून विदयुत साहित्य खरेदी करणेबाबतचा ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभाग

संदर्भ- मा.नगरसेवक प्रभाग क्रमांक १ ते १७ यांच्या यादया.

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत अहवाल सादर करण्यात येतो की, अहमदनगर मनपा हद्दीमधील पथदिवे दुरूस्ती करणेबाबत मा.सदस्य यांनी वेळोवेळी मागणी केली आहे. याबाबत मा. महापौर यांनी देखील सदरचे साहित्य त्वरीत खरेदी करून सर्व प्रभागातील कामे तातडीने करून घेणेबाबत मागणी केलेली आहे.

सद्यस्थितीत विदयुत विभागाकडे साहित्य शिल्लक नसल्यामुळे पथदिवे दुरूस्तीबाबत मा.सदस्य व नागरीक यांचेकडून तातडीने सदरचे कामे पुर्ण होणेबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यानुसार प्र.क्र. १ ते १७ मधील सर्व सदस्यांनी वार्डातील पथदिवेचे दुरूस्तीचे काम त्यांचे स्वेच्छा निधीमधून करून घेणेबाबत मागणी केलेली आहे. अहमदनगर मनपाच्या स्थायी समिती सभा क्र.१ विषय क्र.२ दि.२७/०६/२०१९ अन्वये विदयुत विभागाकरीता सन २०१८-२०१९ या आर्थीक वर्षाकरीता लागणारे विदयुत साहित्याचे वार्षिक दर मंजुर करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार सर्व विदयुत साहित्य स्टोअर विभागामार्फत वार्षिक मंजुर दरानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. सदर बाबत सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार वार्ड निहाय आवश्यक विदयुत साहित्य, त्याबाबत मंजुर दर, अपेक्षित खर्च बाबतचा तपशील सोबत जोडलेला आहे.

तरी विदयुत विभागाकरीता शहरातील पथदिवे दुरूस्ती करणेबाबत सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार वार्षिक मंजुर दरानुसार साहित्य स्टोअर विभागाकडून मंजुर करणेबाबत प्रस्तावास मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर./अ

| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| प्र.इले. सुपरवायझर, | प्र.इले. सुपरवायझ | प्र.इले. सुपरवायझर, | प्र.इले. सुपरवायझर, |
| श्री.ठोंबे एम एस | श्री.तारू ए एच | श्री. क्षेत्रे ए एच | श्री. खेमनार पी आर |

| स्वाक्षरी | स्वाक्षरी |
|---|---|
| कनिष्ठ अभियंता | कनिष्ठ अभियंता |

यावर इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, विदयुत विभाग अंतशी दैनंदिन देखभाल दुरूस्ती करीता मा.नगरसेवक स्वेच्छा निधी मधुन इलेट्रीक मटेरीयल स्टोअर डिपार्टमेंट मार्फत खरेदी करणे (एकुण खर्च रू.६५,१८,२२०/-) बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सविनय सादर. /अ

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, विदयुत विभागाने बजेट तरतुद रिलीज करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे का ? सदरहू तरतुद रिलीज (खास बाब) झाल्याने तर विभागाने कार्यवाही करण्यात हरकत नाही.

यावर इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, जा.क्र.अर्थ /अंदाजपत्रक /३९४/२०२० दि.९/९/२०२० अन्वये मा.सदस्य विकास स्वेच्छा निधी या लेखाशिर्ष खालील प्रत्येकी १ लक्ष प्रमाणे ६७ लक्ष इतकी तरतुद विदयुत विभागाकरीता करणे बाबत मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. तरी सदर बाबत उपरोक्त साहित्य स्टोअर विभागामार्फत खरेदी करणे व त्यानुसार रूपये ६५,१८,२२०/- च्या खर्चास मंजुरी मिळणेस्तव व प्रस्ताव मा.स्थायी समिती कडेस सादर करणे बाबत सविनय सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, जा.क्र.अर्थ ३९४ दि.९/९/२०२० दुरूस्ती आदेश नगर विकास विभाग शासन निर्णय १२ जानेवारी २०१८ मधील निर्णयाची विभागाने खात्री करावी विभागाने आक्षेपाचा खुलासा सादर केलेप्रमाणे "अ" मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर

--**--.

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ४२ चे वाचन करा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :-हा विषय मंजूर झाल्यानंतर,साधारणपणे नगरसेवकांना हे मटेरीयल कधी उपलब्ध होईल याची माहिती श्री.मेहेत्रे साहेब यांनी दयावी.आता थोडयाच दिवसांवर नवरात्र,दसरा,दिवाळी हे मोठे सण आले आहेत.प्रभागामध्ये बल्फ बसवु शकत नाही,टयुब बसवुशकत नाही,आता कमीत कती दसरा दिवाळी च्याआधी हे दिवे चालू झाले तर नागरीकांमध्ये समाधान व्यक्त करतील.नगरसेवकांच्या कामावर व महानगरपालिकेच्या कामावर.दसरा,दिवाळीच्या आत दिवे लागतील का?

इले. विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- ठराव मंजूर झाल्यानंतर लगेच स्टोअर विभागाला ऑर्डर देणार आहे.आम्ही ताबडतोब प्रस्ताव स्टोअर विभगाकडे पाठविणार आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- आपण सर्व शहराकरीता घंटा गाडीचे कॉन्ट्राक्ट दिले होते.त्याप्रमाणे लाईट दुरूस्ती चे व दिवे बदलण्याचे संपुर्ण शहराचे कॉन्ट्रॅक्ट देण्याचे चालले होते.त्याचे काय झाले.

इले. विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- त्याचे टेंडर प्रसिध्द केले आहे.

मा.सभापती साहेब :- विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाअंतर्गत पथदिवे देखभाल दुरूस्तीकरीता मा.नगरसेवक स्वेच्छा निधीमधून विदयुत साहित्य स्टोअर विभागामार्फत अहमदनगर मनपाच्या स्थायी समिती सभा क्र.१ विषय क्र.२ दि.२७/०६/२०१९ अन्वये विदयुत विभागाकरीता सन २०१८-२०१९ या आर्थीक वर्षाकरीता लागणारे विदयुत साहित्याचे वार्षिक मंजूर दरा नुसार खरेदी करण्यास व त्यानुसार रूपये ६५,१८,२२०/- च्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.सदर काम तातडीचे असल्याने प्राधन्यक्रम यादीत समाविष्ठ न करता तातडीने देयक अदा करण्यात यावे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**
**मा.स्थायी समिती सभेची (ऑन लाईन झुम ॲप द्वारे)**

विषय क्रमांक- ४३ शुक्रवार दि.०९/१०/२०२०

**प्रस्तावाचा विषय** :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी १] संदिप प्रभाकर पुंड, २] मनिष कैलास सोनवणे , व पंपचालक यापदी ३] सागर दिलीप जाधव ,४] गहिनीनाथ अंबादास मेने यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनामध्ये वाढ करून करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकुर :- अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १. पाणीपुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र.पाणी पुरवठा विभाग ८२५ दि.३/९/२०१९ अन्वये मानधन वाढ बाबतचा प्रस्ताव

२. पाणीपुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र.पाणी पुरवठा विभाग १४३४ दि.१२/२/२०२० अन्वये पुर्ननेमणूकी बाबतचा प्रस्ताव

३. पाणी पुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ४० दि.१९/५/२०२० अन्वये कार्योत्तर मंजुरीस अधिन राहुन पुर्ननेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग १४३४ दि.१२/२/२०२० अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये पाणीपुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी संबंधीतांची अटी व शर्ती नुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.१६/८/२०१९ ते १५/२/२०२० अखेर सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदत ही दि.१६/२/२०२० रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले होते.

तसेच यापुर्वी पाणीपुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील संदर्भ क्र.१ च्या जा.क्र.पा.पु.८२५ दि.३/९/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करून पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी मानधनावरील नियुक्तीकरीता यांचे मानधनामध्ये रू.२०००/- ते रू.२५००/- इतके मानधनामध्ये वाढ करणे बाबत सुचित केलेले होते. त्यानुषंगाने दि.३१/७/२०१९ रोजी प्रस्तुत प्रकरणी पाणीपुरवा विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.उपायुक्त (सा) यांनी मानधन वाढ बाबत पुर्ननियुकतीच्या वेळेस प्रस्ताव ठेवण्यात यावा असे शेरांकना नुसार नमुद करून निर्देशित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.१९ दि.२७/६/२०१९ च्या पुर्व मंजुरी पारित ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणूक २२०१ दि.२०/९/२०१९ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापी ी संबंधीतांची दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.१६/८/२०१९ पासुन सहा महिन्याकरिता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरची मुदतही दि.१६/२/२०२० रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

संदर्भिय प्रस्ताव क्र.२ च्या प्रस्ताच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव आस्थापना विभागामार्फत कार्यवाहीसाठी प्रस्तावीत होता.

सद्यस्थितीमध्ये कोरोना (कोव्हीड-१९) या रोगाचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव होत असल्याने भारतामध्ये सगळीकडे लॉकडाउन करण्यात आलेले आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समितीची बैठक होणेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

तरी पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता विशिष्ट बाब म्हणून वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने पाणीपुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुत्या स्वरूपात विजंतत्री यापदी १. संदिप प्रभाकर पुंड, २. मनिष कैलास सोनवणे यांची व तात्पुत्या स्वरूपात पंपचालक यापदी ३. सागर दिलीप जाधव व ४. गहिनीनाथ अंबादास मेने यांची तीन दिवसांच्या तांत्रिक खंड देवुन पुढील दिनांक १९/२/२०२० पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे संदर्भ क्र.१ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दरमहा मानधनामध्ये रू.२०००/- ने वाढ करून रूपये १३,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुकती करणेबाबत मा.स्थायी समितीच्या मंजुरी अधिन राहुन नियुक्ती करून तदनंतर सदर पुर्ननियुक्तीस अखेर कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी मा.स्थायी समिती कडे सदरचा प्रस्ताव पाठविणे बाबत प्रस्ताव मान्य झाल्यास सोबत सदर मानधनावर पुर्ननियुक्ती बाबतचा आदेश स्वाक्षरीसाठी सादर.

येणेप्रमाणे सहा.आयुक्त आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मानधनामध्ये वाढ करणेबाबत मा. शासनाचे शासन निर्णय / शासन परिपत्रकासह प्रस्ताव फेरसादर करावे.

यावर सहा.आयुक्त आस्थापना यांचा अभिप्राय की, फेरसादर उपरोक्त प्रस्तावावरील मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे दि.२७/७/२०२० रोजीच्या शेरांकनानुसार की, पाणीपुरवठा विभागामधील तात्पुरत्या स्वरूपात मानधनावरील संबंधीतांच्या दरमहा मानधनामध्ये वाढ करून नियुक्तीबाबत मा. शासनाचे निर्णय / परिपत्रक उपलब्ध नाही. तथापी पाणीपुरवठा विभागाकडील जा.क्र. पा.पु. ८२५ दि. ३/९/२०१९ अन्वयेच्या प्रस्तावामध्ये संबंधीतांच्या दरमहा मानधनामध्ये वाढ करणेबाबत सुचित केलेले असल्याने प्रस्तुत प्रस्तावामध्ये त्याप्रमाणे प्रस्तावीत केलेले आहे. तरी प्रस्तुत प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत) मधील नियम ५३ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस हरकत नसावी., २. मानधनामध्ये वाढ करणेबाबतचा निर्णय आर्थिक / धोरणात्मक स्वरूपाचा असल्याने मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेणे संयुक्तीक होईल., ३. तात्पुरता पुर्ननियुक्तीचा कालावधी सलग १८० दिवसापेक्षा अधिक होत असल्याने MRUT/PULP कायदयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त सा साहेब यांचा अभिप्राय की, मुलेप यांच्या अभिप्रायानुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त अभिप्रायानुसार

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ४३ चे वाचन करा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- मानधनामध्ये किती वाढ करायची,प्रशासनाने रूपये दोन हजार रूपयांची वाढ केली आहे.यामध्ये एक हजार रूपयंनी वाढ करून रू.तीन हजार ने वाढ करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुत्या स्वरूपात विजंतत्री यापदी १. संदिप प्रभाकर पुंड, २. मनिष कैलास सोनवणे यांची व तात्पुत्या स्वरूपात पंपचालक यापदी ३. सागर दिलीप जाधव व ४. गहिनीनाथ अंबादास मेने यांची तीन दिवसांच्या तांत्रिक खंड देवुन पुढील दिनांक १९/२/२०२० पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे,दरमहा मानधनामध्ये प्रशासनाने सुचविलेली रू.२०००/- वाढ नगन्य असून त्यामध्ये रक्कम रूपये १०००/- ने वाढ करून रूपये १४,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती व तदनंतर सदर पुर्ननियुक्तीस अखेर कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

या सभेची विषय पत्रीका प्रसिध्द झाल्या नंतर रक्तपेढी विभागातील आत्यावश्यक सेवेतील लॅबटेक्नीशीयन या पदावरील श्रीमती पल्लवी दगडू मोरे यांची पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट प्राप्त झाला.त्यामुळे सदर ऑफिस रिपोर्टास याच सभेमध्ये त्यांच्या पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :-मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका